पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ●अंक १३ ● रविवार, दि. १९ जुलै २०२६ ●मूल्य ५ ●पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. http://epaper:citynewssuperfast.com


**सुविचार**

समाधानी राहणे हे जगातील सर्वात मोठे सुख आहे.






## » थोडक्यात



**पीव्ही. सिंधू जपान ओपन जिंकणारी पहिली महिला!**

**मुंबई :** भारताची स्टार बॅडमिंटनपटू पीव्ही. सिंधू हिने जपान ओपन सुपर ७५० स्पर्धेत अफलातून कामगिरी करत इतिहास रचला आहे. अंतिम फेरीत तिने जपानच्या आणि माजी विश्वविजेत्या अकेन यामागुचीवर मिळवलेल्या धडाकेबाज विजयामुळे सिंधूच्या कारकिर्दीचे जणू दुसरे पुनरागमन झाले आहे. तिने कट्टर प्रतिस्पर्ध्याचा २१-१७, २१-१७ अशा अंकांनी पराभव केला आणि 'जपान ओपन सुपर ७५०'चे विजेतेपद पटकावले आहे. पीव्ही. सिंधू हिने आपल्या या देदीप्यमान कामगिरीने देशासह क्रीडाविश्वात मोठा आनंदाचं वातावरण आहे. विशेष बाब म्हणजे या विजयासह सिंधू जपान ओपनचे विजेतेपद जिंकणारी पहिली भारतीय खेळाडू ठरली आहे.

..............

**घाटमाथ्यासह मराठवाडा विदर्भात हायअलर्ट!**

**मुंबई :** राज्यभरात गेल्या दोन दिवसांपासून पावसाने हजेरी लावली आहे. शनिवारी मुंबईसह मध्य महाराष्ट्र मराठवाडा आणि विदर्भात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला होता. आजही बहुतांश भागांमध्ये पावसाचे अलर्ट देण्यात आले आहेत. रविवारी पुणे, अहिल्यानगर यासह बीड, परभणी,हिंगोली या जिल्ह्यांना पावसाचे येलो अलर्ट देण्यात आले आहेत. बहुतांश विदर्भात जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला. वाशिम, बुलढाणा, अकोला, अमरावती,यवतमाळ, वर्धा ,नागपूर ,भंडारा, चंद्रपूर,गोंदिया ,गडचिरोली जिल्ह्यालाही येलो अलर्ट देण्यात आला आहे.

.............

**रवींद्र धंगेकरसह पत्नीवर अटकेची टांगती तलवार!**

पुणे : पुण्यातील बांधकाम व्यावसायिक खलील शेख यांच्या आत्महत्याप्रकरणात आता माजी आमदार आणि शिंदे गटाचे नेते रवींद्र धंगेकर यांच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. या प्रकरणात गेल्या काही दिवसांपासून रवींद्र धंगेकर आणि त्यांच्या पत्नीवर अटकेची टांगती तलवार आहे. पोलिसांनी खलील शेख आत्महत्याप्रकरणात धंगेकर पती-पत्नीसह दहाजणांविरोधात गुन्हा दाखल केला होता.

# साखर 50 रुपये किलो

## सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री, तर मधुमेह रुग्णांना आनंद


## इथेनॉलच्या वाढत्या वापरामुळे भाव कडाडले

प्रतिनिधी १९ जुलै

**अकोला :** सर्वसामान्यांच्या स्वयंपाकघरातील हक्काची गोडी आता चांगलीच महागली आहे. बाजारात साखरेच्या दराने पन्नाशी पार केली असून, सध्या साखर ५० रुपये किलो या दराने विकली जात आहे. एका दिवसात ४ ते ५ रुपयांची दरवाढ झाल्याची धक्कादायक माहिती मिळाली आहे.

या दरवाढीमुळे एका बाजूला सर्वसामान्य ग्राहकांच्या खिशाला मोठी चोट बसली आहे, तर दुसऱ्या बाजूला या दरवाढीचे काही





अनपेक्षित आणि रंजक परिणामही पाहायला मिळत आहेत. महागाईचा मोठा फटका ग्राहकांना बसणे सुरु झाले आहे. या महिन्यात सारख ५५ रुपये किलो झाल्यास आश्चर्य वाटू नये अशी काय ती स्थिती आहे. तर सण समारंभात साखर ही ६० रुपये किलोवर स्थिरावले. गणेशोत्सव, दसरा,दिवाळीत साखरचे भाव स्थिरावतील अशी आशा व्यक्त केली जात आहे.साखर पन्नास रुपये किलो झाल्याने सर्वसामान्यांच्या तोंडचे पाणी पळवले आहे. आता या कडू गोड वास्तवाचा सामना करत ग्राहकांना आपल्या जिभेवर आणि खिशावर नियंत्रण ठेवावे लागणार आहे. या भाव वाढीने चहाच्या टपऱ्यांवरील चहा आणि हॉटेल मधील गोड पदार्थांचे दरवाढ अटळ असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. साखरेचे भाव वाढल्याने गृहिणींचे बजेट पार कोलमडले आहे. केवळ घरातील चहा किंवा गोडधोडच नाही, तर हॉटेल व्यावसायिक, मिठाई विक्रेते आणि बेकरी चालकांनाही या दरवाढीचा मोठा फटका बसला आहे. आधीच महागाईने कंबरडे मोडले असताना आता साखरही पन्नाशी पार गेली आहे. सणासुदीच्या काळात गोड खाणेही आता सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे,' अशी प्रतिक्रिया एका महिला ग्राहकाने दिली.

### 'इथेनॉल' ठरले मुख्य कारण

» गेल्या काही काळापासून इंधनामध्ये इथेनॉलचे मिश्रण करण्याचे प्रमाण झपाट्याने वाढले आहे. केंद्र सरकारच्या पर्यावरणपूरक धोरणांमुळे ऊस उत्पादक कारखान्यांचा कल आता साखर उत्पादनापेक्षा इथेनॉल निर्मितीकडे अधिक वाढला आहे. उसाचा रस आणि मळीचा वापर मोठ्या प्रमाणावर इथेनॉल बनवण्यासाठी होत असल्याने, बाजारात साखरेचा पुरवठा काहीसा मर्यादित झाला आहे. मागणी आणि पुरवठ्यातील याच गणितामुळे साखरेचे भाव ५० रुपयांवर पोहोचले आहेत.

### डायबेटिज वाल्यांना आनंद, जिभेला लागणार विराम !

» या भाववाढीचा एक सकारात्मक किंवा गमतीशीर पैलू म्हणजे मधुमेहाच्या रुग्णांमध्ये पसरलेला आनंद! साखरेचे भाव गगनाला भिडल्यामुळे घरात साखरेचा वापर कमी होणार, हे उघड आहे. यामुळे साखर खाणाऱ्यांच्या 'जिभेला आपोआप विराम' मिळणार आहे. साखरेचा खप कमी झाल्यामुळे आरोग्याविषयी जागरूक असणारे आणि मधुमेह असलेले रुग्ण मिश्कीलपणे या वाढीचे स्वागत करत आहेत. किंमत वाढल्यामुळे का होईना, पण डॉक्टरांनी सांगितलेले पथ्य आता सक्तीने पाळले जाईल, अशी मिश्कील टिप्पणी सोशल मीडियावरही पाहायला मिळत आहे.

# बनावट गुटखा फॅक्टरी प्रकरण 'दादाराव' यांच्या आदेशाने प्रकरण थंडावले !

प्रतिनिधी १९ जुलै

अकोला : ईफीड्रॉईन प्रकरणात बार्शिटाकळीतील एका गोदाम मालकाच्या विरोधात गुन्हा दाखल झाला होता. त्याला अद्याप दिलासा मिळाला नाही. बनावट गुटखा फॅक्टरी प्रकरणात मुख्य आरोपी गौरव शर्मा फरार आहे. असे असताना या प्रकरणातील काही आरोपींना अटक पुर्व जामीन मिळाल्याची माहिती आहे. आरोपी कोर्टात येण्यापुर्वी या आरोपींची माहिती पोलिसांना होती काय, यावर आता प्रश्न उपस्थित केले जात आहे. चर्चा सुरु असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

पोलिसांच्या मवाळ भूमिकेमुळे आरोपीला जामीन मिळाल्याची चर्चा शहरात रंगली आहे. तर दुसरीकडे 'दादाराव' इफेक्टमुळे किंवा आदेशामुळे आरोपींना जामीन मिळाल्याचा दावा नाव गोपनीय ठेवण्याच्या अटीवर विश्वसनीय सूत्रांनी केला आहे. बनावट गुटखा फॅक्टरीच्या दोन वेगवेगळ्या गोदाम मालकांसाठी वाशिम सोडून दादाराव यांनी अकोल्यात तळ ठोकला आहे. त्यामुळे काही आरोपींना अटकपुर्व जामीन मिळाल्याची चर्चा या सर्व प्रकरणात आहे. मुख्य आरोपी अटक नसताना इतरांच्या अटकपुर्व जामीनास विरोध का केला गेला की नाही, अशी विचारणा व चर्चा होत आहे.

दोन बनावट गुटखा फॅक्टरी प्रकरणात कोणाचे पैसे गुंतले आहे याचा तपास का होत नाही. एका फॅक्टरीत हळदीसाठी गोदाम दिले होते. दूसरी फॅक्टरी ही आरोपीच्या काकाला गोदामासाठी भाड्याने दिल्याचा दावा केला गेला. गुटखा फॅक्टरी प्रकरणात असे दावे प्रतिदावे केले जात आहे. या दाव्यांमुळे गोदाम भाड्याने घेणाऱ्या काकाच्या विरोधात गुन्हा का दाखल झाला नाही, त्या काकाचा उल्लेख आरोपींमध्ये का नाही. याचा खुलासा अकोला पोलिस करतील काय. एकूणच हे प्रकरण गुंडाळण्याच्या हालचाली वेगाने सुरु असून या प्रकरणात पुढे काही होणे नाही, या अर्थपूर्ण चर्चांनी बाजारपेठेत तपास यंत्रणेवरचा विश्वास उडत चालल्याचे चित्र आहे. या सर्व प्रकरणात निर्माण झालेल्या विविध प्रश्नांचे उत्तरे अन्न व औषध प्रशासन, अकोला पोलिस, स्थानिक गुन्हे शाखा देईल काय,अशी विचारणा सर्व सामान्य अकोलेकर करत आहे. या सर्व प्रकरणात राज्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता तो झाला नाही.



### नेमक्या कुठल्या कारणाने टाळतोय मकोका ?

» अकोल्यात दोन बनावट गुटखा फॅक्टरीवर कारवाई झाली. यातील एक कारवाई एफ डी ए ने केली. तर दूसरी एल सी बी ने केली. असे असताना या दोन्ही प्रकरणात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा लागू करण्यात न आल्याने अकोल्यात नाही तर संपुर्ण राज्यात आश्चर्य व्यक्त केले जात आहे. कारण, राज्यात पहिल्यांदाच गुटखा निर्मितीचे कारखाने समोर आले आहे. गुटखा प्रकरणात, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त यांनी १२ जून २०२६ रोजी सरसकट मकोका कायद्याखाली गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते. पण, त्या आदेशाकडे अकोल्यातील अन्न व औषध प्रशासन विभाग आणि अकोला पोलिस यांनी का दूर्लक्ष केले. अशी विचारणा होत आहे. आयुक्तांच्या १२ जून च्या आदेशानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने मकोका कायद्यातील कलम २३ चे पालन केल्याशिवाय थेट कारवाई करता येणार नाही असे स्पष्ट केले होते. मो.इक्बाल मो. शफी यांच्या प्रकरणात उच्च न्यायालयात पुढील सुनावणी २४ जुलै २०२६ रोजी होणार आहे. कलम २३ नुसार मकोका कायद्याचे पालन करताना उपमहानिरिक्षक (डीआयजी) किंवा त्यावरुन वरिष्ठ दर्जाचा पोलिस अधिकाऱ्याची पुर्व परवानगी त्याच बरोबर तपास उपअधीक्षक दर्जाच्या खालील अधिकाऱ्याला करता येणार नाही. संयुक्त कारवाई पथकात अन्न सुरक्षा अधिकारी असतील. अशा प्रकारे पुर्व परवानगी घेऊन गुटखा फॅक्टरी प्रकरणात पहिला मकोका अकोल्यात लागू शकतो. फक्त अकोल्यातील तपास यंत्रणेची इच्छा त्यासाठी असावी आणि अन्न व औषध प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी आयुक्त तुकाराम मुंढेंच्या आदेशाचे पालन केल्यास ते शक्य आहे.या सर्व प्रकरणात राज्याचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्याशी सिटी न्यूज सुपरफास्ट नेे संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता तो झाला नाही.

### फिट केस यंत्रणा नापास

» अकोल्यात दोन बनावट गुटखा फॅक्टरीवर धाडी पडल्या. या धाडीत गुटखा बंदीनंतर गुटखा निर्मितीची पहिली फॅक्टरी राज्यात सापडली. ती पण, बनावट गुटख्याची. या दोन्ही प्रकरणात वरिष्ठांची परवानगी घेत मकोका दाखल करता आला असता. पण, तो झाला नाही. गुटखा निर्मिती येथे होत होती. गुटखा वितरणाचे जाळे येथे दिसून आले. गुटखा निर्मितीचे सिडिंकेट येथे उघड झाले. गुटखा वितरणाची जाळे तपासात समोर आले असते. त्याच बरोबर गोदामातच कारवाई केल्याने गोदामात मालाचा साठा देखील सापडला. गुटखा निर्मिती, साठा,वितरण या तिन्ही गोष्टींचा उलगडा अकोल्यात झाला. मकोका साठी फिट केस असताना ती न झाल्याचे आश्चर्य तपास यंत्रणेतील वरिष्ठांना आहे. इतकेच नाही तर स्वतःच्या उदरनिर्वाहाच्या उद्योगासाठी एम आय डी सी जागा देते. एम आय डी सी च्या नियमानुसार जागा भाड्याने देता येत नाही. जागा भाड्याने देण्या विषयीची परवानगी संबंधितांनी घेतली होती काय अशी ही विचारणा उद्योजक करत आहे. उद्योगासाठी सबसिडी घेत सरकाराला फसवल्याचे चित्र असताना तिथे भलताच उद्योग सुरु केल्याचे दोन सरकारी धाडीत समोर आले आहे.

# 'भारताची दुसरी स्वातंत्र्य चळवळ', रुग्णालयातून!

## 20 जुलैला संसदेवर मोर्चाचा इशारा



वृत्तसंस्था १९ जुलै

**नवी दिल्ली :** पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना काल १८ जुलै रोजी जंतर मंतर येथे उपोषण करत असताना बळजबरीने उचलून रुग्णालयात नेण्यात आलं. त्यामुळे २० जुलै रोजीचा नियोजित संसदेवरील मोर्चा पुढे ढकलण्यात येणार का, असा प्रश्न निर्माण झाला होता. मात्र, त्यांनी हा नियोजित मोर्चा काढण्याचे आवाहन केले आहे.

महत्त्वाचे म्हणजे हा मोर्चा म्हणजे भारताची दुसरी स्वातंत्र्य चळवळ असेल असंही त्यांनी म्हटलंय. याबाबतचा संदेश त्यांनी त्यांच्या पत्नीमार्फत एक्स पोस्टवर पाठवल्याची माहिती कॉकरोच जनता पार्टीने दिली आहे.

### खासगी रुग्णालयात उपचारांची मागणी

दरम्यान, सोनम वांगचुक यांच्या पत्नीने सफदरगंज रुग्णालयातील उपचारांवर अविश्वास दाखवला आहे. त्यामुळे त्यांनी उच्च न्यायालयात याचिका करून सोनम वांगचुक यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्याची मागणी केली आहे. 'सफदरजंग सरकारी रुग्णालयावरील माझा विश्वास उडाला आहे. रुग्णालयाने आम्हाला सांगितले की वांगचुक यांच्या पोटॅशियमची पातळी २.९ पर्यंत खाली आली आहे आणि ही बाब चिंताजनक व जीवघेणी असल्याचं म्हटलं आहे. तरीही, त्यांच्या सार्वजनिक आरोग्य बुलेटिनमध्ये, त्यांनी सोयीस्करपणे नेमका आकडा वगळला आणि केवळ 'पोटॅशियमची पातळी कमी होत आहे' असा उल्लेख केला. एका स्वतंत्र प्रयोगशाळेच्या चाचणीत ही पातळी ३.५ आढळली, जी सामान्य मर्यादितच आहे.

# नीट'चा निकाल; पालकांची कोर्टात जाण्याची तयारी!

प्रतिनिधी १९ जुलै

**बीड :** 'नीट यूजी २०२६' पुनर्परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर, बीड जिल्ह्यातील काही विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांनी अधिकृत 'ओएमआर' उत्तरपत्रिका आणि 'एनटीए'ने (नॅशनल टेस्टिंग एजन्सी) जारी केलेले अंतिम स्कोअर कार्ड यामधील गुणांच्या फरकाचा मुद्दा उपस्थित केला आहे. या संदर्भात गुणांच्या फेरपडताळणीसाठी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

बीड जिल्ह्यातील विद्यार्थी सोहम नितीन गवते याला अधिकृत ओएमआर शीटच्या मूल्यांकनानुसार ५२२ गुण मिळणे अपेक्षित होते; मात्र त्याच्या अंतिम स्कोअर कार्डवर अवघे ९५ गुण दर्शवण्यात आले आहेत.

# संविधान कुठे उरले आहे- खा. राऊत

## फुटीर खासदारांच्या गटाला लोकसभा अध्यक्षांची मंजुरी!

प्रतिनिधी १९ जुलै

मुंबई : सर्वोच्च न्यायालयाने ४० आमदारांच्या आमच्या प्रलंबित प्रकरणाचा निकाल दिला असता, तर वारंवार देशात पक्ष फोडले गेले नसते. देशात लोकशाहीवर बलात्कार करून हत्या होत आहे. संविधान कुठे उरले आहे? दहाव्या परिशिष्टात कुठल्याही पक्षफुटीला किंवा विलीनीकरणाला मान्यता नाही. मग लोकसभा अध्यक्षांनी ६ फुटीर खासदारांच्या गटाला मान्यता कशी दिली?' असा सवाल ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी उपस्थित केला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला दिल्लीतून एक मोठा धक्का बसला आहे.



ठाकरेंच्या शिवसेनेतून बंडखोरी करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केलेल्या ६ खासदारांच्या गटाला लोकसभा सचिवालयाने आणि लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी अधिकृत मान्यता दिली आहे. या निर्णयावर खा. संजय राऊत यांनी अत्यंत तीव्र शब्दांत न्यायव्यवस्था आणि केंद्र सरकारवर हल्लाबोल केला आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर थेट निशाणा साधताना राऊत म्हणाले, 'एकनाथ शिंदे म्हणजे आचार्य विनोबा भावे नाहीत. दाढी जरी असली तरी ते आचार्य विनोबा भावे नाहीत. ते बोलतील ते सत्य आणि नीतिमत्तेचे आहे असे नाही. ते मशालीवर निवडून आलेले ६ लोक तुम्ही ५० कोटींना विकत घेतले. ते चांगले की वाईट हे सोडून द्या, हे गद्दार आहेत. यात कोणते शौर्य, नीतिमत्ता आणि लोकशाही आहे?

# देशातील पहिला भू-औष्णिक वीज प्रकल्प होतोय लडाखमध्ये!

## सर्वात उंचीवरील खोल विहीर; स्वच्छ ऊर्जा मोहिमेत एक ऐतिहासिक टप्पा



वृत्तसंस्था १९ जुलै

**लेह :** भारताच्या स्वच्छ ऊर्जा मोहिमेत एक ऐतिहासिक टप्पा गाठत लडाख प्रशासनाने 'पुगा व्हॅली' या प्रांतात देशातील पहिल्या भू-औष्णिक (जिओथर्मल) विहिरींचे लोकार्पण केले आहे. समुद्रसपाटीपासून १४,००० फूट उंचीवर १,००० मीटर खोलीच्या दोन विहिरी यशस्वीरित्या कार्यान्वित करण्यात आल्या असून, या भागात भारतातील पहिला भू-औष्णिक वीज प्रकल्प उभारण्याच्या दिशेने हे एक अत्यंत महत्त्वाचे पाऊल असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

लडाख प्रशासनाने पुगा व्हॅली या थंड वाळवंटी प्रदेशात १४,००० फूट उंचीवर १,००० मीटर खोलीच्या दोन विहिरी खोदल्या आहेत.नायब राज्यपाल व्ही. के. सक्सेना यांच्या हस्ते या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. या दोन्ही विहिरी पुगा येथील एक मेगावॅट क्षमतेच्या प्रायोगिक भू-औष्णिक वीज प्रकल्पाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. हा भारताचा पहिला प्रात्यक्षिकस्तरीय भू-औष्णिक वीज प्रकल्प असणार आहे. लडाख प्रशासन, लडाख स्वायत्त पर्वतीय विकास परिषद (एलएएचडीसी) लेह आणि ओएनजीसी एनर्जी सेंटर यांच्यातील त्रिपक्षीय सामंजस्य कराराची मुदत संपल्यामुळे या प्रकल्पाला मोठा फटका बसला होता.

### जगातील सर्वात आव्हानात्मक वातावरणात काम!

प्रकल्प अभियंत्यांनी दिलेल्या माहितीनुसार, ४०० मीटर खोलीवर कमाल १३५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. पुढील चाचण्या सुरू असून, एक मेगावॉट प्रकल्पाच्या संचालनासाठी आणखी जास्त तापमान मिळण्याची आशा आहे. अत्यंत विषम हवामान, खडतर भूप्रदेश आणि मर्यादित कार्यकाळ अशा जगातील सर्वात आव्हानात्मक वातावरणात हे काम करण्यात आले.

# भोंदू अशोक खरातसह पत्नी कल्पनाविरुद्ध ईडीकडून मनी लॉन्ड्रिंगचा ठपका!

प्रतिनिधी १९ जुलै

**नाशिक :** जिल्ह्यासह राज्यभरात आपल्या काळ्याकृत्यांनी मागील काही दिवसांपूर्वी चर्चेत आलेल्या भोंदू अशोक खरात याने दैवी अवतार असल्याचा दावा करत अनेक भक्तांची ठिकठिकाणी आर्थिक फसवणूक व लैंगिक शोषण केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. याप्रकरणी अंमलबजावणी संचालनालयाच्या (ईडी) मुंबई येथील विभागीय कार्यालयाने त्याच्यासह पत्नी संशयित कल्पना खरात व अन्य चार जणांविरोधात 'मनी लॉन्ड्रिंग'चा ठपका ठेवला आहे. येथील विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे, तसेच ३६.९० कोटी रूपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

नाशिक शहरासह ग्रामीण भागात, तसेच अहिल्यानगरच्या शिर्डी, राहता पोलिस ठाण्यांमध्ये भोंदू अशोक खरात याच्याविरुद्ध दाखल झालेल्या अनेक गुन्ह्यांच्या आधारे ईडीने मनी लॉन्ड्रिंगचा तपास सुरू केला होता. राज्यभरातून शेकडो भक्तांना धार्मिक श्रद्धेच्या नावाखाली गंडवून कोट्यवधी रुपयांची संपत्ती उभी केल्याचा आरोप अशोक खरात याच्यावर आहे. स्वतः दैवी अवतार असल्याचे सांगून 'अवतार पूजा', असाध्य आजार बरे करणे, दुर्दैव दूर करणे आणि व्यवसायात भरभराट घडवून आणण्याचे आमिष दाखवून भक्तांकडून रोख रक्कम, दागिने आणि मालमत्ता हडपल्याचे आतापर्यंतच्या तपासात समोर आले आहे.ईडीच्या माहितीनुसार, आरोपीने एका कर्मचाऱ्याच्या संगनमताने विविध बँक खाती आणि बेनामी खात्यांचा वापर करून मोठ्या प्रमाणात रोख व्यवहार केले. दोन सहकारी पतसंस्थांमार्फत गुन्ह्यातून मिळालेल्या रकमेचे मनी लॉन्ड्रिंग केले.




# बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचा पंतप्रधान इंदिरा गांधी यांचा ऐतिहासिक निर्णय!



भारतातील १४ प्रमुख व्यापारी बँकांचे राष्ट्रीयीकरण १९ जुलै १९६९ रोजी करण्यात आले. तत्कालीन पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी हा ऐतिहासिक निर्णय घेतला होता. राष्ट्रीयीकरण करण्यात आलेल्या बँकांमध्ये ५० कोटींहून अधिक ठेवी असलेल्या १४ मोठ्या खाजगी बँकांचा समावेश होता.या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे देशातील ८५ टक्क्यांहून अधिक बँक ठेवींवर सरकारी नियंत्रण आले. राष्ट्रीयीकरणाचा मुख्य उद्देश बँकिंग सुविधांचा विस्तार ग्रामीण भागापर्यंत करणे, शेती आणि लघु उद्योगांना कर्जपुरवठा करणे हा होता. याआधी केवळ १९५५ मध्ये स्थापन झालेली 'स्टेट बँक ऑफ इंडिया' हीच एकमेव सार्वजनिक क्षेत्रातील बँक होती.

भारतातील आधुनिक बँकिंगची सुरुवात १८ व्या शतकाच्या मध्यावर झाली. पहिल्या बँकांमध्ये बँक ऑफ हिंदुस्थान, जी १७७० मध्ये स्थापन झाली आणि १८२९-३२ मध्ये विसर्जित झाली; आणि जनरल बँक ऑफ इंडिया, जी १७८६ मध्ये स्थापन झाली परंतु १७९१ मध्ये अयशस्वी झाली, यांचा समावेश होता. सर्वात मोठी आणि सर्वात जुनी बँक जी अजूनही अस्तित्वात आहे ती स्टेट बँक ऑफ इंडिया आहे. जून १८०६ च्या मध्यात बँक ऑफ कलकत्ता म्हणून तिची स्थापना झाली आणि तिने काम सुरू केले. १८०९ मध्ये, तिचे नाव बदलून बँक ऑफ बंगाल असे ठेवण्यात आले. प्रेसिडेन्सी सरकारने स्थापन केलेल्या तीन बँकांपैकी ही एक होती , इतर दोन बँका म्हणजे १८४० मधील बँक ऑफ बॉम्बे आणि १८४३ मधील बँक ऑफ मद्रास. १९२१ मध्ये या तिन्ही बँकांचे विलीनीकरण करून इम्पीरियल बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली, जी भारताच्या स्वातंत्र्यानंतर १९५५ मध्ये स्टेट बँक ऑफ इंडिया बनली . अनेक वर्षे, प्रेसिडेन्सी बँकांनी आणि त्यांच्या उत्तराधिकाऱ्यांनी अर्ध-मध्यवर्ती बँका म्हणून काम केले, जोपर्यंत १९३५ मध्ये रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया कायदा, १९३४ अंतर्गत रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना झाली नाही.

१९६० मध्ये, स्टेट बँक ऑफ इंडिया (सहाय्यक बँका) कायदा, १९५९ अंतर्गत स्टेट बँक ऑफ इंडियाला आठ राज्य-संलग्न बँकांचे नियंत्रण देण्यात आले. तथापि, या संलग्न बँकांचे एसबीआयमध्ये विलीनीकरण १ एप्रिल २०१७ रोजी अंमलात आले. १९६९ मध्ये, भारत सरकारने १४ प्रमुख खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण केले ; बँक ऑफ इंडिया ही त्या मोठ्या बँकांपैकी एक होती. १९८० मध्ये, आणखी ६ खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या राष्ट्रीयीकृत बँका भारतीय अर्थव्यवस्थेतील बहुसंख्य कर्जदाते आहेत. त्यांच्या मोठ्या आकारामुळे आणि व्यापक जाळ्यांमुळे त्यांचे बँकिंग क्षेत्रावर वर्चस्व आहे.

भारतीय बँकिंग क्षेत्राचे ढोबळमानाने अनुसूचित आणि गैर-अनुसूचित बँकांमध्ये वर्गीकरण केले जाते. अनुसूचित बँका म्हणजे त्या, ज्यांचा समावेश भारतीय रिझर्व्ह बँक कायदा, १९३४ च्या दुसऱ्या अनुसूचीमध्ये आहे. अनुसूचित बँकांचे पुढे वर्गीकरण केले जाते: राष्ट्रीयीकृत बँका; स्टेट बँक ऑफ इंडिया आणि तिच्या सहयोगी बँका; प्रादेशिक ग्रामीण बँका (आरआरबी); परदेशी बँका; आणि इतर भारतीय खाजगी क्षेत्रातील बँका. एसबीआयने १ एप्रिल २०१७ रोजी आपल्या सहयोगी बँकांचे स्वतःमध्ये विलीनीकरण करून भारतातील सर्वात मोठी बँक तयार केली आहे. या विलीनीकरणामुळे एसबीआयने आपले जागतिक स्थान लक्षणीयरीत्या सुधारले आहे, आणि २०२५ पर्यंत फॉर्च्युन ग्लोबल ५०० निर्देशांकात १६३ व्या क्रमांकावर आहे. व्यावसायिक बँका या संज्ञेमध्ये बँकिंग नियमन कायदा, १९४९ अंतर्गत नियंत्रित अनुसूचित आणि गैर-अनुसूचित अशा दोन्ही व्यावसायिक बँकांचा समावेश होतो.सर्वसाधारणपणे भारतातील बँकिंगचा पुरवठा, उत्पादनांची श्रेणी आणि पोहोच बऱ्यापैकी परिपक्व आहे - तरीही ग्रामीण भारत आणि गरिबांपर्यंत पोहोचणे हे अजूनही एक आव्हान आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने आपल्या शाखांचे जाळे विस्तारून आणि राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेने (नाबार्ड) सूक्ष्म वित्त (मायक्रोफायनान्स ) सारख्या सुविधा देऊन सरकारने यावर उपाययोजना करण्यासाठी उपक्रम विकसित केले आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) मते, भारतात २४.२३ दशलक्षाहून अधिक मुदत ठेवी आहेत , ज्यामध्ये सध्या एकूण १०३ ट्रिलियनपेक्षा जास्त रक्कम अडकलेली आहे. हा आकडा चालू खात्यांमध्ये असलेल्या १८.५ ट्रिलियन आणि बचत खात्यांमध्ये असलेल्या ५९.७० ट्रिलियन पेक्षा जास्त आहे, ज्यांची एकूण रक्कम १८१ ट्रिलियन होते.

बहुतेक संशोधन अभ्यासांनुसार, सुरक्षितता आणि संरक्षणामुळे भारतीयांनी ऐतिहासिकदृष्ट्या इतर गुंतवणुकीच्या पर्यायांपेक्षा बँक ठेवींना प्राधान्य दिले आहे . सेबीच्या सर्वेक्षणानुसार, ९५ टक्केपेक्षा जास्त भारतीय ग्राहक त्यांचे पैसे बँक खात्यात ठेवण्यास प्राधान्य देतात, तर १० टक्केपेक्षा कमी ग्राहक इक्विटी किंवा म्युच्युअल फंडांमध्ये गुंतवणूक करणे निवडतात. भारतीय रिझर्व्ह बँकेनुसार, भारतीय कुटुंबांच्या आर्थिक मालमत्तेचा एक महत्त्वपूर्ण भाग बँक ठेवींच्या स्वरूपात ठेवला जातो. हे भारतीय कुटुंबांच्या सुरक्षित आणि तरल मालमत्तेसाठी असलेल्या पारंपरिक पसंतीशी सुसंगत आहे.

## बँकांचा इतहिास

वेद , प्राचीन भारतीय ग्रंथ, व्याजाच्या संकल्पनेचा उल्लेख करतात , ज्यात ' कुसिदीन ' या शब्दाचा अर्थ 'सावकार' असा होतो. सूत्र (इ.स.पू. ७००-१००) आणि जातक कथा (इ.स.पू. ६००-४००) मध्येही व्याजाचा उल्लेख आहे. या काळातील ग्रंथांनी व्याजाचा निषेधही केला: वसिष्ठांनी ब्राह्मण आणि क्षत्रिय वर्णांना व्याजात सहभागी होण्यास मनाई केली . इसवी सन दुसऱ्या शतकापर्यंत, व्याज अधिक स्वीकारार्ह बनले. मनुस्मृतीने व्याजाला संपत्ती मिळवण्याचे किंवा उपजीविका करण्याचे एक स्वीकारार्ह साधन मानले. तसेच एका विशिष्ट दरापेक्षा जास्त दराने पैसे उधार देणे आणि वेगवेगळ्या जातींसाठी वेगवेगळे कमाल दर ठेवणे हे एक गंभीर पाप मानले. जातक कथा, धर्मशास्त्र आणि कौटिल्य यांच्या ग्रंथांमध्ये देखील ऋणपत्र, ऋणपन्न किंवा ऋणलेखय नावाच्या कर्जपत्रांच्या अस्तित्वाचा उल्लेख आहे. नंतर मौर्य काळात (इ.स.पू. ३२१-१८५), आदेश नावाचे एक साधन वापरात होते, जे एका बँकरला नोटवरील रक्कम तिसऱ्या व्यक्तीला देण्याचा आदेश होता, जे आधुनिक विनिमय पत्राच्या व्याख्येशी जुळते. या साधनांच्या मोठ्या वापराची नोंद आहे. मोठ्या शहरांमध्ये, व्यापारी एकमेकांना पतपत्रे देखील देत असत. कर्जपत्रांचा वापर मुघल काळातही चालू राहिला आणि त्यांना (उर्दू/हिंदीमध्ये) दस्तावेझ म्हटले जात असे . दोन प्रकारच्या कर्जपत्रांची नोंद आहे. दस्तावेझ-ए-इंदुलतलाब मागणीनुसार देय होते आणि दस्तावेझ-ए-मियादी एका विहित वेळेनंतर देय होते. शाही खजिन्यांद्वारे, ज्यांना बारातेस म्हटले जात असे, देयकाच्या निर्देशांच्या वापराची देखील नोंद आहे. भारतीय बँकांनी परदेशी देशांवर विनिमयपत्रे जारी केल्याच्या नोंदी देखील आहेत. हुंडी , एक प्रकारचे पत साधन, याचा विकास देखील याच काळात झाला आणि ते वापरात राहिले.

ब्रिटिश राजवटीच्या काळात व्यापाऱ्यांनी १८२९ मध्ये युनियन बँक ऑफ कलकत्ताची स्थापना केली. प्रथम एक खाजगी संयुक्त भांडवली संस्था म्हणून, नंतर भागीदारी म्हणून. तिचे मालक पूर्वीच्या कमर्शियल बँक आणि कलकत्ता बँकेचे मालक होते, ज्यांनी परस्पर संमतीने या दोन बँकांच्या जागी युनियन बँक तयार केली. १८४० मध्ये तिने सिंगापूरमध्ये एक एजन्सी स्थापन केली आणि मागील वर्षी उघडलेली मिर्झापूर येथील एजन्सी बंद केली. तसेच १८४० मध्ये बँकेने उघड केले की बँकेच्या लेखापालाने तिची फसवणूक केली होती. युनियन बँकेची १८४५ मध्ये नोंदणी झाली परंतु १८४८ मध्ये ती अयशस्वी झाली, कारण ती काही काळ दिवाळखोर होती आणि ठेवीदारांकडून मिळालेल्या नवीन पैशांचा वापर लाभांश देण्यासाठी केला होता. १८६५ मध्ये स्थापन झालेली आणि आजही कार्यरत असलेली अलाहाबाद बँक ही भारतातील सर्वात जुनी संयुक्त भांडवली बँक आहे , मात्र ती पहिली नव्हती. हा मान बँक ऑफ अप्पर इंडियाला जातो, जी १८६३ मध्ये स्थापन झाली आणि १९१३ पर्यंत टिकली, जेव्हा ती अयशस्वी झाली आणि तिची काही मालमत्ता आणि दायित्वे सिमलाच्या अलायन्स बँकेकडे हस्तांतरित करण्यात आली .




## भारताच्या 1857 च्या स्वातंत्र्ययुद्धातील आद्य क्रांतिकारक मंगल पांडे!



मंगल पांडे यांचा जन्म उत्तर प्रदेशातील फैजाबाद जिल्ह्यातील नगवा या गावात एका ब्राह्मण परिवारात झाला. ब्रिटॅनिका वरील नोंदी प्रमाणे त्यांचा जन्म १९ जुलै १८२७ रोजी झाला असावा. तर उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या म्हणण्यानुसार त्यांना मंगल पांडे यांचे वंशज भेटले असून, त्यांच्या जवळील पुराव्यानुसार मंगल पांडे यांचा जन्म ३० जानेवारी १८३१ रोजी झाला होता. त्यांना लहानपणापासूनच धाडसी कृत्यांची आवड होती. नेमबाजी, तलवारयुद्ध इत्यादी कलांमध्ये ते पारंगत होते. मंगल पांडे त्याचबरोबर आपल्या हिंदू धर्माबद्दल अत्यंत संवेदनशील आणि अभिमानी होते.

ज्या वेळी १८४९ साली, त्यांनी ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्यात नोकरीस सुरुवात केली, त्यावेळी ते २२ वर्षांचे होते. पांडे हे बराकपूर सैन्यदलामधील बंगालच्या ३४ व्या बी. एन. आय तुकडीच्या ५ व्या कंपनीत काम करत होते. कोलकात्याजवळील बराकपूर येथील १९ व्या पलटणीला दिलेली काडतुसे गाय वा डुक्कर यांची चरबी लावलेली आहेत असा समज सैन्यात पसरला होता. ही काडतुसे बंदुकीत भरण्यापूर्वी त्यांना लावलेले आवरण दातांनी तोडावे लागे. अशा वेळी या आवरणाला लावलेली गाईची वा डुकराची चरबी तोंडात जाऊ शकेल या भीतीने या पलटणीतील शिपायांनी ती काडतुसे स्वीकारण्याचे नाकारले. इतकेच नव्हे, तर प्रतिकारार्थ त्यांनी शस्त्र उपसले. त्या दिवशी ब्रिटिश अधिकाऱ्यांची संख्या कमी असल्याने ब्रिटिशांनी तो अपमान मुकाट्याने गिळला. त्यांनी ब्रह्मदेश (म्यानमार) हून गोऱ्या सैनिकांची कुमक मागवून या पलटणीला निःशस्त्र करून अपमानित अवस्थेत हाकलून द्यायचे ठरवले. याची अंमलबजावणी बराकपूरला करण्याचे ठरले. या अपमानास्पद कारवाईमुळे मंगल पांडेने आपल्या सहकाऱ्यांना ब्रिटिशांविरुद्ध उठाव करण्याचे आवाहन केले. ३१ मे रोजी एकदम सर्वत्र क्रांतियुद्धाला प्रारंभ करण्याची श्रीमंत नानासाहेब पेशवे आदींची योजना होती. मात्र १९ व्या पलटणीतील स्वदेशबंधूंचा आपल्यादेखत अपमान व्हावा, ही गोष्ट मंगल पांडे यांना आवडली नाही. २९ मार्च १८५७ रोजी कवायतीच्या मैदानावर मंगल पांडे बराकपूर छावणीत ब्रिटिश करत असलेल्या अन्यायाविरुद्ध देशी सैनिकांना उत्तेजित करू लागले. 'मर्दहो, उठा !' अशी गर्जना करून ते सैनिकांना म्हणाले, 'आता माघार घेऊ नका. बंधूंनो, चला तुटून पडा ! तुम्हाला तुमच्या धर्माची शपथ आहे !! चला, आपल्या स्वातंत्र्यासाठी शत्रूचा निःपात करा!!!'

हे पहाताच सार्जंट मेजर ह्यूसन याने त्यांना पकडण्याची आज्ञा केली; पण एकही सैनिक जागचा हालला नाही. उलट मंगल पांडे यांची गोळी लागून ह्यूसन जखमी झाला. हे पहाताच लेफ्टनंट बॉ घोडा नाचवत मंगलवर चाल करून आला. एवढ्यात मंगलच्या बंदुकीतून सुटलेली गोळी घोड्याच्या पोटात शिरली. घोडा लेफ्टनंटसह भूमीवर आडवा झाला. मंगल पांडे यांना पुन्हा बंदुकीत गोळया भरायचा अवसर मिळण्याआधीच लेफ्टनंट बॉ आपले पिस्तुल काढून उभा राहिला. मंगल पांडे यांनी तिळमात्रही न डगमगता आपली तलवार उपसली. बॉने पिस्तुल झाडले; पण मंगल पांडे यांनी त्याचा नेम चुकवला. आपल्या तलवारीने मंगल पांडे यांनी त्यालाही लोळवले. ह्यूसन व बॉ आपल्या निवासस्थानांकडे पळून गेले.एवढ्यात शेख पालटू नावाचा मुसलमान शिपाई मंगलच्या दिशेने जाऊ लागला. तो आपल्या पलटणीतील असल्यामुळे आपल्याला मदत करायला येत असावा, असे मंगल पांडे यांना वाटले; पण तसे घडले नाही. शेख पालटूने मंगल पांडे यांना पाठीमागून विळखा घातला. पांडे यांनी त्याचा विळखा सोडवला. देशी शिपाईही शेखच्या रोखाने दगड व जोडे फेकू लागले. जिवाच्या भीतीने शेख पालटू पळून गेला. थोड्याच वेळात कर्नल व्हीलर त्या स्थानी आला. त्याने सैनिकांना मंगल पांडे यांना पकडण्याची आज्ञा केली. कर्नल व्हीलरला सैनिकांनी निक्षून सांगितले, "आम्ही या पवित्र ब्राह्मणाच्या केसालासुद्धा हात लावणार नाही. हिंदुस्थानच्या भूमीवरून वाहाणारे गोऱ्या अधिकाऱ्यांचे रक्त आणि समोरचे धर्माभिमानी शिपाई पाहून कर्नल व्हीलर त्याच्या बंगल्याकडे पळून गेला. नंतर जनरल हिअर्स पुष्कळसे युरोपियन शिपाई घेऊन मंगल पांडे यांच्यावर चालून गेला. तोपर्यंत दुपार झाली होती. मंगल पांडे थकले होते. आपण फिरंग्यांच्या हातात सापडणार, हे पहाताच त्यांनी बंदूक आपल्या छातीकडे रोखली व स्वतःवर गोळी झाडून घेतली. मंगल पांडे धरणीवर कोसळले आणि त्यांची शुद्ध हरपली. नंतरच ब्रिटिश त्यांना पकडू शकले. आठवडाभरातच त्यांच्यावर सैनिकी न्यायालयात अभियोग चालवण्यात आला. स्वधर्मावर प्राणापलीकडे निष्ठा ठेवणाऱ्या या तरण्याबांड क्षात्रवीराला न्यायालयाने कटामध्ये सामील असलेल्यांची नावे विचारली; परंतु मंगल पांडे यांच्या मुखातून कोणाचेही नाव बाहेर पडले नाही. पांडे यांना सैनिक न्यायालयात फाशीची शिक्षा सुनावण्यात आली. आपल्या देशबांधवांच्या अपमानासाठी स्वतःचे प्राण देणाऱ्या या क्रांतीच्या अग्रदूताविषयी लोकांत इतकी विलक्षण श्रद्धा निर्माण झाली होती की, साऱ्या बराकपूरमध्ये त्यांना फाशी देण्यास एकही मांग मिळेना. शेवटी या घाणेरड्या कामासाठी कोलकात्याहून चार माणसे मागवण्यात आली. मंगल पांडे ज्या तुकडीचे सैनिक होते, तिच्या सुभेदाराला इंग्रजांनी ठार मारले. १९ आणि ३४ या दोन्ही पलटणी त्यांनी निःशस्त्र करून खालसा केल्या.

## जागतिक कीर्तीचे भारतीय खगोलशास्त्रज्ञ अन् लेखक!



डॉ. जयंत नारळीकर यांची आज जयंती

डॉ. जयंत विष्णू नारळीकर हे भारतीय खगोलशास्त्रज्ञ व लेखक होते. डॉ. नारळीकर हे अचानक आणि अपघाताने घडलेले पण आपली नाममुद्रा कोरलेले साहित्यिक आहेत. 'नारायण विनायक जगताप' या उलट्या क्रमाने आपल्या नावाची आद्याक्षरे होणाऱ्या टोपण नावाने त्यांनी विज्ञानकथा स्पर्धेत भाग घेतला.

नारळीकरांचा जन्म कोल्हापूर येथे १९ जुलै १९३८ रोजी झाला. त्यांचे वडील, रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे एक प्रसिद्ध गणितज्ज्ञ, वाराणसी येथील बनारस हिंदू विद्यापीठाच्या गणित शाखेचे प्रमुख होते. त्यांची आई सुमती विष्णू नारळीकर ह्या संस्कृत विदुषी होत्या. जयंत नारळीकरांचे शालेय शिक्षण वाराणसी येथे झाले. इ.स. १९५७ साली त्यांनी विज्ञानात पदवी प्राप्त केली.या परीक्षेत त्यांनी प्रथम क्रमांक पटकावला. त्यानंतर उच्च शिक्षणासाठी ते ब्रिटनमधील केंब्रिज येथे गेले.

तेथे त्यांना बीए, एमए व पीएचडीच्या पदव्या मिळाल्या. शिवाय, रँग्लर ही पदवी, खगोलशास्त्राचे टायसन मेडल, स्मिथ पुरस्कार व इतर अनेक बक्षिसे मिळाली.

१९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला सदाशिव राजवाडे (गणितज्ज्ञ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत - गीता, गिरिजा व लीलावती. १९७२ साली ते भारतात परतले. त्यांनी मुंबई येथील टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या (टी.आय.एफ.आर.) खगोलशास्त्र विभागात प्रमुख म्हणून पद स्वीकारले. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ. नारळीकर यांच्या पत्नी मंगला नारळीकर ह्या 'नभात हसते तारे' या पुस्तकाच्या सहलेखिका आहेत. 'पाहिलेले देश भेटलेली माणसं' हे त्यांनी स्वतंत्रपणे लिहिलेले पुस्तक आहे. ३, ४ व ५ डिसेंबर या तारखांना कुसुमाग्रजनगरी, नाशिक येथे ९४व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद जयंत नारळीकर यांना प्रदान करण्यात आले होते.

डॉ. जयंत नारळीकर यांनी सर फ्रेड हॉयल यांच्यासोबत 'कन्फॉर्मल ग्रॅव्हिटी थिअरी' मांडली. चार दशकाहून अधिक कालावधीपासून त्यांचे खगोलभौतिकी क्षेत्रात संशोधन सुरू आहे. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू आहे. सामान्य माणसाला खगोलशास्त्र समजवण्यासाठी त्यांनी गेली अनेक वर्षे प्रयत्न केले आहेत. यासाठी सर्व प्रसारमाध्यमांचा ते उपयोग करतात. त्यांच्या 'यक्षांची देणगी' या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला आहे.

नारळीकरांनी 'चार नगरांतले माझे विश्व' या विलक्षण ओघवत्या आणि साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळालेल्या आत्मकथनाचा समारोप करताना 'विज्ञानप्रसार आणि अंधश्रद्धानिर्मूलन यांच्या मागे लागताना पदोपदी जाणवते की, आपल्या सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या समाजावर देखील अंधश्रद्धांचा पगडा आहे,' असे खेदाने म्हणले आहे. मात्र, लगेच संस्कृत सुभाषिताचे उद्धरण देऊन त्यांनी 'कितीही विघ्ने कोसळली तरी शहाणी माणसे आपले नियतकर्तव्य सोडत नाहीत' असाही उतारा त्याला जोडला आहे. असे कर्तव्य नारळीकर जन्मभर विविध माध्यमांमधून करत आले आहेत. त्यांनी विज्ञानप्रसाराला डौलदार, अर्थवाही मराठी भाषा दिली. भाषणे, लेख, कथा, मुलांची शिबिरे हे सारे मार्ग चोखाळले. नारळीकरांचा वैज्ञानिक आणि अंधश्रद्धानिर्मूलनाचा विचार संस्कृती आणि काही विशिष्ट अर्थांनी धर्मही नाकारत नाही. त्यामुळेच, तो संतुलित, उदार आणि समाजाचा साकल्याने विचार करणारा आहे. आजचे महाराष्ट्राचे विचारविश्व कमालीचे गढूळ, कोते आणि ऱ्हस्वदृष्टीचे बनले आहे. त्याला ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या विशाल क्षितिजांचे निदान दर्शन तरी घडविण्याची गरज आहे. ते घडविण्याची क्षमता आणि अधिकार जयंत नारळीकरांकडे आहे. त्यांच्या निवडीने महाराष्ट्रातील एका उज्ज्वल परंपरेला नवी दिशा मिळते आहे. मात्र, हे पाऊल केवळ प्रतीकात्मक राहता कामा नये. मराठी साहित्य आणि संस्कृती व्यवहारांचा पुढचा प्रवास या नव्या दिशेने होत राहिला तरच साहित्य संमेलनाचा हा विज्ञानयोग सार्थकी लागेल, असे त्यांचे म्हणणे आहे. विविध मराठी नियतकालिकांतून जयंत नारळीकर यांचे विज्ञानविषयक माहितीने भरलेले ललित लेखन सातत्याने प्रसिद्ध होत असते. नारळीकरांच्या पुस्तकांची जगांतील अनेक भाषांत रूपांतरे झाली आहेत.

नारळीकर यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार आणि मानद डॉक्टरेट मिळाली आहेत. त्यांच्या संशोधन कार्यासाठी २००४ मध्ये त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान पद्मविभूषण प्रदान करण्यात आला. याआधी, १९६५ मध्ये त्यांना पद्मभूषण प्रदान करण्यात आले होते. १९८१ मध्ये त्यांना इचलकरंजी येथील एफआयई फाउंडेशनने 'राष्ट्र भूषण' प्रदान केले होते. त्यांना २०१० सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार मिळाला. त्यांना भटनागर पुरस्कार , एमपी बिर्ला पुरस्कार आणि सोसायटी ॲस्ट्रोनॉमिक डी फ्रान्स (फ्रेंच ॲस्ट्रोनॉमिकल सोसायटी) चे प्रिक्स ज्यूल्स जॅन्सेन हे पुरस्कार मिळाले आहेत. त्यांच्या वैज्ञानिक संशोधनाव्यतिरिक्त, नारळीकर हे त्यांच्या पुस्तके, लेख आणि रेडिओ आणि दूरदर्शन कार्यक्रमांद्वारे विज्ञानाचे संवादक म्हणून प्रसिद्ध आहेत. या प्रयत्नांसाठी, त्यांना १९९६ मध्ये युनेस्कोने कलिंग पुरस्काराने सन्मानित केले. १९८९ मध्ये, त्यांना केंद्रीय हिंदी संचालनालयाकडून आत्माराम पुरस्कार मिळाला. त्यांना १९९० मध्ये भारतीय राष्ट्रीय विज्ञान अकादमीचा इंदिरा गांधी पुरस्कार मिळाला. त्यांनी २००९ मध्ये इन्फोसिस पुरस्कारासाठी भौतिक विज्ञान ज्युरीमध्येही काम केले. २०१४ मध्ये, त्यांना त्यांच्या मराठीतील आत्मचरित्र, चार नागरांतले भूलभुलैया विश्वासाठी साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्यांनी जानेवारी २०२१ मध्ये नाशिक येथे झालेल्या ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूषविले. डॉ. विजया वाड यांनी डॉ. नारळीकर यांचे 'विज्ञान यात्री डॉ. जयंत नारळीकर' या नावाचे चरित्र लिहिले आहे. खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांच्या व्यक्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा वेध एका लघुपटाद्वारे घेतला गेला आहे. साहित्य अकादमीची निर्मिती असलेल्या एका तासाच्या या लघुपटाचे दिग्दर्शन अनिल झणकर यांनी केले आहे.

## राधास्वामीचा खरा अर्थ : बाह्य उपस्थिती नव्हे, तर अंतर्मनातील परिवर्तन

आज मी हा लेख कोणत्याही व्यक्तीचा किंवा पंथाचा अपमान करण्यासाठी लिहित नाही. उलट, मी स्वतः जे पाहिले, अनुभवले आणि आत्मसात केले, त्यातून निर्माण झालेला विचार समाजासमोर मांडण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न आहे. राधास्वामी सत्संगात प्रथमच गेलो, तेव्हा तेथील वातावरण, शांतता, प्रेम, नम्रता आणि अध्यात्मिक विचार मनाला स्पर्श करून गेले. तेथे वारंवार एकच संदेश दिला जातो—अति चिंता करू नका, अति धावपळ करू नका, धनसंपत्तीच्या मोहात अडकू नका. शांत, साधे आणि संयमी जीवन जगा. मन परमात्म्याशी जोडा. बाबाजींच्या चरणी अहंकार, दुःख आणि आसक्ती अर्पण करा. जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्त होण्याचा प्रयत्न करा. हेच राधास्वामी तत्त्वज्ञानाचे सार आहे. परंतु एक प्रश्न माझ्या मनात वारंवार निर्माण झाला.हे ऐकणारे आपण प्रत्यक्ष जीवनात तसे जगतो का?

आज अनेक जण सत्संगाला जातात, नामदान घेतात, सेवा करतात; परंतु त्यांचे मन मात्र सतत संसारातील चिंता, पैसा, प्रतिष्ठा, नोकरी, शेती, व्यवसाय, मुलांचे शिक्षण, मुलींचे लग्न, जास्त संपत्ती, मोठे घर आणि अधिक सुखसोयी याभोवतीच फिरत राहते.

यात संसार करणे चुकीचे नाही. संसार प्रत्येकालाच करावाच लागतो. परंतु संसार करताना जर मन पूर्णपणे मोह, लोभ, स्पर्धा आणि अहंकाराने व्यापले गेले, तर मग सत्संगातून आपण काय शिकलो?

जर आपले विचार इतर सामान्य माणसांप्रमाणेच राहणार असतील, तर सत्संग आणि अध्यात्म यात फरक काय राहिला?आज अनेक जण असे म्हणताना ऐकायला मिळतात—

"बाबाजींच्या कृपेने माझी नोकरी लागली."
"बाबाजींच्या कृपेने शेती चांगली झाली."
"बाबाजींच्या कृपेने मुलीचे लग्न झाले."
"बाबाजींच्या कृपेने व्यवसाय वाढला."

हे सर्व घडले असेल, त्याबद्दल कृतज्ञता असणे योग्यच आहे. पण एवढाच का बाबाजींच्या कृपेचा अर्थ? बाबाजींची कृपा फक्त पैसा, नोकरी, शेती, विवाह आणि भौतिक यश मिळवून देण्यासाठी आहे का?

राधास्वामींच्या शिकवणीत सर्वात मोठी कृपा कोणती सांगितली आहे? मन शुद्ध होणे, अहंकार नष्ट होणे, मोह कमी होणे, नामाशी एकरूप होणे आणि जन्म-मरणाच्या चक्रातून मुक्त होणे. जर या गोष्टी आपल्या जीवनात घडत नसतील, तर आपण सत्संगाचे खरे सार समजून घेतले आहे का? प्रत्येक संताने आपल्या जीवनातून एकच संदेश दिला आहे—स्वतःला बदला. मन बदला. वासनांवर विजय मिळवा. लोभ, क्रोध, मोह आणि अहंकार यांचा त्याग करा. परमात्म्याशी नाते जोडा.पण आपण काय करतो? सत्संग संपला की पुन्हा त्याच स्पर्धेत उडी घेतो.

दुसऱ्याकडे किती पैसा आहे, कोणाचे मोठे घर आहे, कोणाची नोकरी मोठी आहे, कोणाची जमीन जास्त आहे, कोणाचा जावई श्रीमंत आहे—याच विचारांत आयुष्य संपते. अशा अवस्थेत आपण स्वतःला विचारले पाहिजे—

मी सत्संगाला का जातो? लोकांनी मला धार्मिक म्हणावे म्हणून? की माझ्या मनाचे परिवर्तन व्हावे म्हणून? जर माझ्यात पूर्वीसारखाच लोभ, राग, मत्सर, स्वार्थ आणि अहंकार असेल, तर नामदानाचा अर्थ काय? सत्संगाचा अर्थ फक्त उपस्थिती नाही.

सत्संग म्हणजे सत्संगातील विचार आपल्या प्रत्येक कृतीत उतरवणे. खरा भक्त तो नाही जो फक्त बाबाजींचे नाव घेतो. खरा भक्त तो आहे ज्याच्या वागण्यात नम्रता आहे, ज्याच्या मनात दया आहे, ज्याच्या जीवनात प्रामाणिकपणा आहे, ज्याच्या हृदयात स्वार्थ कमी होत जातो आणि जो प्रत्येक दिवस स्वतःला बदलण्याचा प्रयत्न करतो. पैसा आवश्यक आहे; पण तोच जीवनाचे अंतिम ध्येय नाही.

निवृत्ती तायडे,
गा. हिवरखेड ता. तेल्हारा. जि.अकोला

सिटी न्यूज अकोला
रविवार, दि. १९ जुलै २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com

# या वर्षी शेतकरी अडकला विविध संकटात

प्रतिनिधी १९ जुलै



या वर्षी पावसाने दरवर्षी प्रमाणात उशिरा हजेरी लावून जिल्ह्यातील शेतकऱ्यांना जवळपास एक महिना उशिरा पेरणी करावी लागली.त्या मागे महागडे खते बियाणे,आणि बोगस बियाणे यामुळे जवळपास ४० टक्के शेतकऱ्यांना दुबार पेरण्या कराव्या लागल्या. ज्यांच्या पेरण्या साधल्या त्यांना ते पीक वन्य प्राण्यांपासून वाचविण्यासाठी रात्र दिवस सोकारी करून जोपासण्याची वेळ आली आहे.अशातच पावसाची दडी अशा विविध संकटांमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांना घर प्रपंचा पासून मुला मुलींचे शिक्षण आणि इतर खर्चाचा सामना कसा करावा, यामुळे शेतकरी चिंतेत सापडला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून आसमानी सुलतानी संकटाच्या खाईत सापडणारा शेतकरी या वर्षी विविध संकटांमध्ये सुरुवाती पासूनच सापडला आहे.दरवर्षी जून महिन्यामध्ये होणारी पेरणी या वर्षी पावसाच्या उशिराच्या आगमनाने त्यांची पेरणी जेमतेम एक महिना उशिरा आटोपती झाली.

गत वर्षी बोगस बियाण्यामुळे,आणि अतिवृष्टीमुळे बऱ्याच शेतकऱ्यांना दुबार तिबार पेरण्या कराव्या लागल्या. गत वर्षी बोगस बियाणे वितरीत करणाऱ्या कृषी सेवा केंद्र अथवा बियाणे निर्मित कंपन्यांवर तात्काळ कारवाई झाली नसल्यामुळे, या वर्षी विविध कंपन्यांचे बळ वाढून विविध कंपन्यांचे बोगस बियाणे उगवले नसल्याची जवळपास ४० टक्के शेतकऱ्यांकडून आरोळी उठली.आणि अशा शेतकऱ्यांना उधार उसनवारी करून दुबार पेरणी करावी लागल्याचे समोर आले. आणि ज्या शेतकऱ्यांच्या पेरण्या साधल्या त्या शेतकऱ्यांच्या शेतामध्ये वन्यप्राणी धुमाकुळ घालून पीक उध्वस्त करीत आहेत. आणि ते पिक वाचविण्यासाठी शेतकऱ्यांना रात्रंदिवस सोकारी करण्यात आपली झोप घालवण्याची वेळ आली आहे.अशातच जवळपास १५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्यामुळे,पिकांची वाढ खुंटली आहे. अशा विविध संकटांमध्ये सापडलेल्या शेतकऱ्यांच्या घरामध्ये भविष्यातील पीक येणार की नाही, याची चिंता लागली असून सदर पीक घरात आलेच नाही तर, बारमाही घर प्रपंच, मुला मुलींचे शिक्षण आणि ईतर खर्च कसा भागवावा या चिंतेमुळे शेतकरी मानसिक शारीरिक स्वास्थ हरवून बसत असल्याची चिन्हे दिसत आहेत.

या वर शासनाने उपाय योजना म्हणून शेतकऱ्यांना सरसकट एकरी ५०,००० रुपये पिक विमा देऊन शेतकऱ्यांना न्याय देण्याची मागणी होत आहे.त्या शिवाय शेतकऱ्यांना पर्याय नसल्याचे पारावरील होत असलेल्या चर्चे मधून समोर आले आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंतीपूर्वी हाय-व्होल्टेज विद्युत तारा स्थलांतरित करण्याची मागणी



प्रतिनिधी १९ जुलै

**मूर्तिजापूर :** अण्णाभाऊ साठे जयंतीपूर्वी शहरातील आठवडी बाजार परिसरातील अण्णाभाऊ साठे कॉम्प्लेक्सजवळून जाणाऱ्या हाय-व्होल्टेज विद्युत तारा तातडीने स्थलांतरित करून आवश्यक सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणी माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद रामदास दुबे यांनी अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री मा. आकाशदादा फुंडकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, अण्णाभाऊ साठे कॉम्प्लेक्समध्ये दरवर्षी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त विविध सामाजिक, सांस्कृतिक व अभिवादनाचे कार्यक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांना हजारो नागरिक उपस्थित राहत असल्याने परिसरात मोठी गर्दी होते. मात्र, अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याच्या अगदी जवळून हाय-व्होल्टेज विद्युत तारा गेल्यामुळे गंभीर अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. कार्यक्रमादरम्यान किंवा इतर वेळी या तारांचा संपर्क आल्यास जीवितहानी होण्याची शक्यता असून अण्णाभाऊ साठे कॉम्प्लेक्समधील दुकानदार, व्यावसायिक आणि नागरिकांनाही सातत्याने या धोक्याचा सामना करावा लागत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर अण्णाभाऊ साठे जयंतीपूर्वी संबंधित हाय-व्होल्टेज विद्युत तारा तातडीने स्थलांतरित कराव्यात किंवा आवश्यक त्या सर्व सुरक्षा उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच मूर्तिजापूर नगर परिषद आणि महावितरण प्रशासनाने या गंभीर बाबीकडे तातडीने लक्ष देऊन योग्य ती कार्यवाही करावी, अशी मागणीही माजी नगराध्यक्ष द्वारकाप्रसाद दुबे यांनी केली आहे.

# इंडिया पोस्टतर्फे राष्ट्रीय मसकोट डिझाइन स्पर्धा; नागरिकांना सहभागाचे आवाहन

प्रतिनिधी १९ जुलै

**अकोला :** भारत सरकारच्या दळणवळण मंत्रालयाच्या डाक विभागातर्फे (डिपार्टमेंट ऑफ पोस्ट) माय जीओवी या व्यासपीठाद्वारे इंडिया पोस्टच्या अधिकृत मसकोट डिझाइन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून, देशभरातील नागरिकांकडून प्रवेशिका मागविण्यात येत आहेत. इंडिया पोस्टच्या मूल्यांचे, विश्वासार्हतेचे आणि आधुनिक सेवाभिमुख दृष्टिकोनाचे प्रतिनिधित्व करणारा अधिकृत मसकोट तयार करणे हा या स्पर्धेचा मुख्य उद्देश आहे.

प्रस्तावित मसकोटमध्ये विश्वास, सर्वसमावेशकता, डिजिटल सक्षमीकरण, शेवटच्या टप्प्यापर्यंत (लास्ट माईल) सेवा पोहोचविण्याची बांधिलकी तसेच "डाक सेवा जन सेवा" या तत्त्वांचे प्रभावी प्रतिबिंब असावे. याशिवाय इंडिया पोस्टची आधुनिक, तंत्रज्ञानाधारित आणि ग्राहक-केंद्रित संस्था म्हणून ओळख अधिक दृढ करण्याबरोबरच युवक व बालकांमध्ये सर्जनशीलतेला चालना देणे हाही या स्पर्धेचा उद्देश आहे.

स्पर्धकांनी माय जीओवी पोर्टल (www.mygov.in) वर मसकोटचे डिझाइन आणि त्याचे नाव या दोन्ही गोष्टी सादर कराव्यात. सादर करण्यात येणारी प्रवेशिका पूर्णपणे मूळ, सर्जनशील आणि मुद्रित साहित्य, डिजिटल माध्यमे, ॲनिमेशन, मर्चेंडाइज, प्रदर्शने, सोशल मीडिया तसेच विविध अधिकृत प्रचार मोहिमांसाठी उपयुक्त असणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) द्वारे तयार केलेल्या अथवा साहित्यचौर्य (प्लॅगीराईजम) असलेल्या प्रवेशिका स्विकारल्या जाणार नाहीत. ही स्पर्धा सर्व वयोगटातील भारतीय नागरिकांसाठी खुली असून प्रत्येक स्पर्धकाला केवळ एकच प्रवेशिका सादर करता येणार आहे. सादर केलेल्या मसकोटच्या डिझाइन व नावाचे संपूर्ण मालकी हक्क संबंधित स्पर्धकाकडे असणे आवश्यक आहे.

स्पर्धेचा शुभारंभ झाला असून प्रवेशिका सादर करण्याची अंतिम तारीख 15 ऑगस्ट 2026 आहे. स्पर्धेचा अंतिम निकाल 9 नोव्हेंबर 2026 रोजी जाहीर करण्यात येणार आहे. मसकोट डिझाइन स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास 75 हजार व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकासाठी 50 हजार व प्रमाणपत्र, तर तृतीय क्रमांकासाठी 25 हजार व प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. मसकोट नामकरण स्पर्धेत प्रथम क्रमांकासाठी 25 हजार, द्वितीय क्रमांकासाठी 15 हजार आणि तृतीय क्रमांकासाठी 10 हजार तसेच प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विजेत्यांना पारितोषिकाची रक्कम इलेक्ट्रॉनिक पद्धतीने वितरित करण्यात येईल. या स्पर्धेत जास्तीत जास्त नागरिकांनी सहभागी होऊन आपली सर्जनशीलता प्रदर्शित करावी, असे आवाहन प्रवर अधीक्षक डाकघर यांनी केले आहे.

## मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात बदल

**अकोला :** भारत निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षणाचा सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार पुनरिक्षणाची परिपूर्ण कार्यवाही करण्याचे निर्देश जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी दिले आहेत. नवीन बदलानुसार, मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत केली जाणारी गृहभेटींची प्रक्रिया 8 ऑगस्टपर्यंत चालणार आहे. तसेच मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण आणि पुनर्रचना करण्याचे काम 8 ऑगस्टपर्यंत पूर्ण केले जाईल. यानंतर १७ ऑगस्ट रोजी मतदार यादीची प्रारूप प्रसिद्धी केली जाणार आहे. नागरिकांना या यादीवर आपले दावे आणि हरकती नोंदवण्यासाठी 17 ऑगस्ट ते 16 सप्टेंबर असा एक महिन्याचा कालावधी देण्यात आला आहे. या प्राप्त झालेल्या सर्व दाव्यांचा आणि हरकतींचा निपटारा 15 ऑक्टोबरपर्यंत केला जाईल आणि 19 ऑक्टोबर रोजी मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी केली जाईल.

# अकोला कच्छी मेमन जमाततर्फे मोफत छाती एक्स-रे शिबिर यशस्वी; 100 रुग्णांनी घेतला लाभ

प्रतिनिधी १९ जुलै



**अकोला :** अकोला कच्छी मेमन जमाततर्फे एस. शक्ती प्रकल्पाअंतर्गत 18 जुलै रोजी आयोजित करण्यात आलेले मोफत छाती एक्स-रे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले. अकोला महानगरपालिकेच्या क्षयरोग विभागाच्या सहकार्याने केएमटी हॉल, अकोला येथे आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात 100 रुग्णांनी मोफत छाती एक्स-रे तपासणीचा लाभ घेतला.

हे शिबिर दीर्घकाळ खोकला, छातीत दुखणे, सतत ताप येणे, अचानक वजन कमी होणे, भूक न लागणे, रात्री जास्त घाम येणे किंवा कफातून रक्त येणे अशा तक्रारी असलेल्या नागरिकांसाठी आयोजित करण्यात आले होते. या उपक्रमाचा उद्देश फुफ्फुसांचे आजार व क्षयरोग (टीबी) यांचे लवकर निदान करून रुग्णांना वेळेत उपचार उपलब्ध करून देणे हा होता.

एस. शक्ती प्रकल्पाअंतर्गत अकोला महानगरपालिकेच्या क्षयरोग (टीबी) विभागाचे जिल्हा समन्वयक सुरेश यादव मिर्जे, एक्स-रे तंत्रज्ञ मोहम्मद आमिर तसेच कम्युनिटी व्हॉलंटिअर्स गणेश वानखेडे आणि पुरुषोत्तम हांबीर यांनी शिबिराच्या यशस्वी आयोजनात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

शिबिरात सहभागी झालेल्या सर्व 100 रुग्णांचे छातीचे एक्स-रे करण्यात आले. या एक्स-रे अहवालांचे तज्ज्ञांकडून परीक्षण करण्यात येणार असून, ज्या रुग्णांमध्ये टीबी किंवा इतर कोणत्याही आजाराची लक्षणे आढळतील त्यांच्याशी संपर्क साधून पुढील तपासणी व उपचाराची व्यवस्था करण्यात येणार आहे.

हे शिबिर यशस्वी करण्यासाठी अकोला कच्छी मेमन जमातचे अध्यक्ष जावेद झकरिया, सचिव सलीम गाझी, हनीफ मलक, जावेद खान, शहबाज खान, चांद खान, फजल कुरेशी, इहेनुलहक कुरेशी, जावेद खान मियाखान, असलम मंडपवाला, रामूभाई तसेच मोहम्मद युनूस यांच्यासह जमातचे अनेक पदाधिकारी व स्वयंसेवकांनी परिश्रम घेतले. या प्रसंगी नगरसेवक रफीक सिद्दीकी, नगरसेवक चंद चौधरी तसेच निखिल दिवेकर यांनी उपस्थित राहून शिबिराला भेट दिली व या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले. अकोला कच्छी मेमन जमातचे अध्यक्ष जावेद झकरिया यांनी सांगितले की, समाजातील प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत आरोग्य सेवा पोहोचविणे हा जमातचा प्रमुख उद्देश आहे. भविष्यातही अशा प्रकारचे मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करून अधिकाधिक नागरिकांना वेळेत तपासणी व उपचाराचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू राहतील असे सांगितले.

# हिवरखेड पोलिसांनी दिले 10 गोवंशाना जीवनदान



प्रतिनिधी १९ जुलै

**हिवरखेड :** ग्राम झरी बाजार मार्गावर काही लालची व्यक्ती निर्दयपणे, १० गुरे घेऊन जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी धाड टाकून दोघांना ताब्यात घेतले तर मुख्य सूत्रधार अंधाराचा फायदा घेऊन पसार झाले.

पोलिस मुख्य सूत्रधारांचा शोध घेत असून आरोपी सर्जन दलसिंग भटनागर, महेंद्र रोकड्या चापले राहणार चंदनपुर यांच्या विरुद्ध प्राणी सुरक्षा अंतर्गत गुन्हे दाखल केले.

१० गोवंशाची सुटका करण्यात आली. ही कारवाई हिवरखेडचे ठाणेदार सचिन पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कर्मचारी विनोद खर्डे, प्रवीण कुंजाम, प्रमोद चव्हाण, रोहन बोराडे यांनी केली,

सुटका झालेले १० गोवंश पोलिसांनी गोरक्षक आकाश गायकी, अजय सोनोने यांच्या सहकार्याने गोरक्षणच्या सुपूर्द केले.

# आलेगावातील जुन्या विहिरीतून निघत आहे गरम पाणी

प्रतिनिधी १९ जुलै



**आलेगाव :** येथील वंजार पुरा स्थित रहिवाशी वैभव दत्तात्रय मुर्तळकर यांच्या घरातील पन्नास वर्षे पूर्वी काळातील घरातील वापरातील विहिरी मध्ये अच्यानक तीन दिवसांपासून गरम पाणी येणे सुरू झाल्यामुळे,बध्यांची गर्दी जमली.

पातूर तालुक्यातील आलेगाव येथील वंजारपुरा येथे स्थित राहणारे वैभव दत्तात्रय मूर्तडकर यांच्या घरामध्ये पन्नास वर्षा पूर्वी पासून असलेल्या विहिरीतील पाण्याचा वापर व पिण्याकरिता गेल्या अनेक वर्षा पासून सदर कुटुंब करीत होते.परंतु गेल्या तीन दिवसांपासून सदर विहिरीतून मोटर द्वारे पाणी अच्यानक एकदम गरम पाणी यायला लागले.त्या पाण्यामुळे भांडे सुद्धा गरम झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.ह्या नंतर सदर चर्चा जोमात झाल्याने सदर प्रकार पाहण्यासाठी गर्दी करून अनेकांनी प्रत्यक्ष खात्री करून घेतली. अनेकांच्या चर्चे नुसार पाण्यातील मोटर मुळे,असला प्रकार होत असावा असा अंदाज व्यक्त केला असता.पाण्यातील मोटरला बाहेर काढून बकेट द्वारे पाणी खेचून पाणी गरमच आढळून आले. सदर पाणी कशामुळे गरम होत आहे.ह्या पाण्यामुळे काही अपाय होऊ नये म्हणून सदर कुटुंबाने विहिरीतील पाणी वापरणे थांबविले असून,जलभूमी तज्ञानि पाण्याचे नमुने घेऊन पाण्यामध्ये असा अच्यानक बदल होण्याचे कारण स्पष्ट करून सदर पाणी पिण्यास योग्य राहणार की नाही या बाबत स्पष्ट करून कुटुंबाला न्याय द्यावा अशी मागणी मुर्तडकर परिवाराने केली आहे.

# अंडरपासमध्ये पाणीच पाणी

**अकोला :** शहरातील मध्यवर्ती बसस्थानकासमोरील अंडरपासमध्ये पावसाचे पाणी मोठ्या प्रमाणात साचल्याने हा मार्ग वाहतुकीसाठी जवळपास बंदच झाला आहे. तसेच बरेच दिवसांपासून हे पाणी साचून असल्याने त्याला एकप्रकारची दुर्गंधी सुटली आहे. त्यामुळे शहरवासीयांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. याच प्रकारे जनता भाजी बाजारातील कचरा याच भागातील मोकळ्या जागेवर टाकण्यात येत असून त्यालाही दुर्गंधी सुटली आहे. त्यामुळे बसस्थानक परिसरात प्रवाशांसह नागरिकांना या दुर्गंधीचा सामना दररोज करावा लागत आहे. यावर उपाययोजना करण्याची मागणी होत आहे.

# अण्णाभाऊ साठे पुण्यतिथी साजरी

## याचं स्थळी जल्लोषात जयंतीची तयारी

प्रतिनिधी १९ जुलै



**हिवरखेड :** प्रभाग क्रमांक १ मधील श्री मातंग समाजाच्या वतीने साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांची पुण्यतिथी सभागृहात साजरी करण्यात आली, अण्णाभाऊ साठे यांच्या ऐतिहासिक विविध सत्यागाथवर विविध प्रकारची माहिती देण्यात आली, साहित्य सम्राट यांच्या दीड दिवसाच्या शिक्षणाने रचला इतिहास तर , त्यांच्या विविविध गाजलेल्या कादंबऱ्या, त्यांचा मुंबई दिल्ली रेल्वे प्रसंग, असे विविध प्रकारचे त्यांचे त्या काळीचे प्रसंग या स्थळी कार्यक्रमाचे अध्यक्ष शिवा धुरदेव, मधुकर वानखडे, गजानन राठोड, अर्जुन खिरोडकार, यांनी विचार मांडले तर साहित्य लेखक अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली यावेळी उमेश धुरदेव, सुरजोसे गुरुजी, दीपक धुरदेव,हर्षल धुरदेव, रामदास धुरदेव,अनुप धुरदेव, राजू धुरदेव, अनुराग धुरदेव, अभिषेक धुरदेव, विकास धुरदेव, गोलू धुरदेव, रोहित धुरदेव, रोहन धुरदेव, चेतन धुरदेव, कुणाल तायडे, दीपक वाघमारे, अविनाश धुरदेव, आदित्य धुरदेव, श्रावण धुरदेव, यांच्यासह लहुजीसेनेचे सैनिक उपस्थित होते, तर येत्या ऑगस्ट रोजी अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती जल्लोषात साजरी करण्याची तयारी सुद्धा या स्थळी करण्यात येत आहे,

# नाईक होमिओपॅथीमध्ये होतोय असाध्य आजारांवर उपचार

## डॉ. प्रथमेश नाईक दर सोमवार, मंगळवार, बुधवार दिवसभर उपलब्ध

प्रतिनिधी १९ जुलै





**अकोला :** येथील प्रसिद्ध डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये थायरॉईड, लठ्ठपणा, ॲसिडिटी, गुडघेदुखी, कंबरदुखी, संधिवात, मायग्रेन सारख्या असाध्य आजारांवर उपचार घेऊन रुग्ण आता निरोगी जीवन जगत आहेत. ॲडव्हान्स होमिओपॅथीच्या उपचारामुळे आतापर्यंत हजारो रुग्णांना मोठा फायदा झाला आहे. डॉ. प्रथमेश नाईक दर सोमवार, मंगळवार, बुधवार असे तीन दिवस दिवसभर उपलब्ध राहणार आहेत.


गेल्या ४० वर्षांपासून डॉ. नाईक होमिओपॅथीमध्ये शरीराच्या सर्व आजारांवर संपूर्ण आणि यशस्वी उपचार केले जात आहेत. ज्या रुग्णांना इतर ठिकाणी उपचार घेऊनही फरक पडलेला नाही, अशा रुग्णांनी एकदा येथे नक्कीच भेट दिली पाहिजे.अधिक माहितीसाठी रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक ९१७५९५७१२९ किंवा ९१३००१६१२९ या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधू शकतात, तसेच Naikhomoe-opathy.com (You-tube) वर अधिक माहिती मिळवू शकतात. येथे उपचार घेऊन पूर्णपणे बऱ्या झालेल्या एका महिला रुग्णाने आपला अनुभव व्यक्त केला आहे. मी वेदिका, मी नाईक होमिओपॅथी येथे येण्यापुर्वी माझे वजन खुप वाढले होते. काही करण्याचा उत्साह, प्रेâशपणा राहला नव्हता, डिप्रेशन मध्ये गेले होते.




आत्मविश्वास राहला नव्हता, व्यायाम करण्यासाठी त्रास व्हायचा, दम लागायचा. नाईक होमिओपॅथी येथे उपचार सुरू केला आणि ६ महिन्यात माझे २० किलो वजन कमी झाले. याकरिता मला डॉ. प्रथमेश नाईक सरांचे खुप मार्गदर्शन लाभले. डिप्रेशन कमी झाले, व्यायाम करता येतो, आत्मविश्वास वाढला, उत्साह, उमंग जाणवतो. नाईक होमिओपॅथी उपचारामुळे मी समाधानी आणि आनंदी आहे.

# सततची नापिकी व कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

प्रतिनिधी १९ जुलै



**मूर्तिजापूर :** तालुक्यातील खरब दोरे शिवारात सततची नापिकी, वाढते कर्ज आणि आर्थिक विवंचनेला कंटाळून एका शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना शनिवारी (दि. १८) सकाळी उघडकीस आली. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली असून शेतकरी संकटाचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

मृत शेतकऱ्याचे नाव विजय उत्तमराव देशमुख (वय ५७, रा. मराठा नगर, मूर्तिजापूर) असे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, त्यांच्या मालकीची सुमारे सात एकर शेती होती. मात्र मागील काही वर्षांपासून सततची नापिकी, उत्पादन खर्चात झालेली वाढ आणि कर्जाच्या ओझ्यामुळे ते आर्थिक अडचणीत सापडले होते. त्यांच्यावर बुलढाणा अर्बन बँकेचे सुमारे तीन लाख रुपयांचे कर्ज असल्याचे सांगण्यात येत आहे. शनिवारी सकाळी सुमारे दहा वाजण्याच्या सुमारास देशमुख यांनी शेताशेजारील झाडाला इलेक्ट्रिक केबलच्या साहाय्याने गळफास घेऊन जीवन संपविले. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि पोलिसांना माहिती दिली. माहिती मिळाल्यानंतर मूर्तिजापूर ग्रामीण पोलीस स्टेशनचे उपनिरीक्षक चंदन वानखडे यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला.

## मतदारांनी एस आय आर चे फॉर्म भरून द्यावे

**अकोला :** भारतीय निवडणूक आयोगाच्या स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन मोहीमे अंतर्गत नवीन नोंदणी करु इच्छिणाऱ्या तसेच सर्व जुन्या मतदारांनी गणना प्रपत्र भरून देणे आवश्यक आहे. मतदार याद्या अद्ययावत आणि अचूक ठेवण्यासाठी हि मोहीम राबविण्यात येत आहे. बुथ लेव्हल अधिकारी प्रत्येक घरी जाऊन गणना प्रपत्र, चे वाटप करत आहेत.

## निधन वार्ता

**शीतल बरडिया**



**अकोला :** येथील श्रावगी प्लॉट मधील रहिवासी शीतल गौरव बरडिया ४१, यांचे १९ जुलै रोजी निधन झाले. आज सायंकाळी ५ वाजता श्रावगी प्लॉट मधील निवासस्थान येथून अंत्ययात्रा निघणार आहे. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. १९ जुलै २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# बोगस सोयाबीन बियाणे; सहा एफआयआर दाखल

## शेतकऱ्यांची दिशाभूल; बियाणे कंपन्यांविरोधात कठोर कारवाई

प्रतिनिधी १९ जुलै



**यवतमाळ:** सोयाबीन बियाण्यांची उगवण न झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाल्याच्या तक्रारींची गंभीर दखल घेत कृषी विभागाने यवतमाळ जिल्ह्यात मोठी कारवाई केली आहे. जिल्ह्यातील यवतमाळ, दारव्हा, आर्णी, दिग्रस आणि बाभूळगाव तालुक्यांमध्ये १८ जुलै रोजी एकाच दिवशी सहा प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल करण्यात आले. पार्श्व जेनेटिक इंडिया लिमिटेड, व्हिगर बायोटेक प्रा. लि. आणि बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स प्रा. लि. या तीन बियाणे कंपन्यांविरोधात शेतकऱ्यांची दिशाभूल करून फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जिल्ह्यात यंदा सोयाबीन पेरणीनंतर अनेक ठिकाणी उगवण अपेक्षेपेक्षा कमी झाल्याने शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे तक्रारी दाखल केल्या होत्या. त्यानंतर कृषी अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शेतभेटी, पंचनामे, बियाणे पिशव्यांची तपासणी, टॅगची पडताळणी तसेच प्रयोगशाळा अहवालांच्या आधारे संबंधित कंपन्यांविरुद्ध कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू केली. प्राथमिक तपासात काही कंपन्यांनी बियाण्यांच्या पिशव्यांवर केलेले दावे बियाणे नियमांच्या विरोधात असल्याचे निदर्शनास आल्याचा दावा फिर्यादींमध्ये करण्यात आला आहे. यवतमाळ ग्रामीण पोलीस ठाण्यात कृषी अधिकारी तथा बियाणे निरीक्षक संजय अनंतराव पवार यांनी पार्श्व जेनेटिक इंडिया लिमिटेड या कंपनीविरोधात फिर्याद दाखल केली आहे. ६ ते १५ जुलैदरम्यान सोयाबीन उगवण न झाल्याबाबत सहा शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. बियाण्यांच्या पिशव्यांवर "प्रिमियम सोयाबीन सीड" असा दावा करण्यात आला होता. हा दावा बियाणे नियम १९६८ मधील नियम १० व २३ नुसार दिशाभूल करणारा असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित कंपनीने चुकीचे दावे करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. याच दिवशी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातील कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) प्रेमनाथ परशराम आडे यांनी बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स प्रा. लि. या जालना येथील कंपनीविरोधात स्वतंत्र एफआयआर दाखल केला. या कंपनीविरोधात पाच शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. तपासादरम्यान बियाण्यांच्या पिशव्यांवर "बेस्ट क्वालिटी गॅरंटी – १०० टक्के समाधान" असा दावा करण्यात आल्याचे आढळले. याशिवाय नागपूर येथील बियाणे तपासणी प्रयोगशाळेच्या अहवालात संबंधित बियाण्यांची उगवण आवश्यक ७० टक्क्यांऐवजी केवळ ५८ टक्के असल्याचे नमूद करण्यात आल्याचा उल्लेख फिर्यादीत करण्यात आला आहे. दारव्हा पोलीस ठाण्यात कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) निलेश निरंजन भोयर यांनी व्हिगर बायोटेक प्रा. लि. या कंपनीविरोधात फिर्याद दाखल केली. या कंपनीच्या सोयाबीन बियाण्यांबाबत तब्बल ३८ शेतकऱ्यांनी तक्रारी नोंदवल्या आहेत. कंपनीने बियाण्यांच्या टॅगवर ७० टक्के उगवणीचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात उगवण झाली नसल्याने शेतकऱ्यांची दिशाभूल झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. आर्णी पोलीस ठाण्यात कृषी अधिकारी तथा बियाणे निरीक्षक लक्ष्मण केशवराव लखमोड यांनीही व्हिगर बायोटेक कंपनीविरोधात स्वतंत्र एफआयआर दाखल केला आहे. १४ ते १६ जुलैदरम्यान नऊ शेतकऱ्यांच्या तक्रारी प्राप्त झाल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. कंपनीने उगवणीबाबत केलेला दावा आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात मोठी तफावत असल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. दिग्रस पोलीस ठाण्यात कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) साक्षी सुरेश आडे यांनी बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स कंपनीविरोधात फिर्याद दिली. या कंपनीच्या बियाण्यांबाबत ३१ शेतकऱ्यांनी तक्रारी केल्या आहेत. प्रयोगशाळेच्या अहवालात उगवणीचे प्रमाण अपेक्षित निकषांपेक्षा कमी असल्याचे नमूद करण्यात आले असून, कंपनीने "बेस्ट क्वालिटी गॅरंटी – १०० टक्के समाधान" असा दावा करून शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. बाभूळगाव तालुक्यातही बुस्टर प्लॅन्ट जेनेटिक्स कंपनीविरोधात स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यात एकाच दिवशी विविध पोलीस ठाण्यांत दाखल झालेल्या एफआयआरची संख्या सहावर पोहोचली आहे. कृषी विभागाने यापूर्वी तक्रारींची पडताळणी, शेतभेटी, पंचनामे आणि बियाण्यांचे नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठविल्यानंतरच ही कारवाई केली असल्याची माहिती सूत्रांनी दिली. या सर्व प्रकरणांमध्ये अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ मधील कलम ३ व ७, बियाणे कायदा १९६६ मधील संबंधित तरतुदी, बियाणे नियम १९६८ मधील नियम १० व २३ तसेच भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३१८ (४) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. संबंधित पोलीस ठाण्यांकडून तपास सुरू असून बियाणे उत्पादन, पॅकिंग, विक्री, गुणवत्तेचे दावे आणि प्रयोगशाळा अहवाल यांची सखोल पडताळणी केली जाणार आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर सोयाबीन पेरणी झाल्यानंतर उगवण न झाल्याच्या तक्रारी वाढत असल्याने कृषी विभागाने यापुढेही दोषी आढळणाऱ्या कंपन्यांविरोधात कठोर कारवाईचा इशारा दिला आहे. या कारवाईकडे जिल्ह्यातील हजारो सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांचे लक्ष लागले असून तपासातून पुढे आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# आर्णी बसस्थानक परिसरातील 200 मीटरमध्ये अवैध पार्किंगवर कारवाई

## वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन

प्रतिनिधी १९ जुलै




**आर्णी :** उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात खाजगी वाहनांचे पार्किंग व अनधिकृत थांबे करण्यास मनाई असतानाही आर्णी बसस्थानक परिसरात नियमभंगाच्या घटना वाढत असल्याची दखल घेत विशेष कारवाई मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत नियमबाह्य पद्धतीने उभी करण्यात आलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.

बसस्थानक परिसरात अवैध पार्किंगमुळे वाहतूक कोंडी, अपघाताचा धोका आणि प्रवाशांची गैरसोय वाढत असल्याच्या तक्रारी सातत्याने पुढे येत होत्या. या पार्श्वभूमीवर उप प्रादेशिक परिवहन विभागाचे मोटार वाहन निरीक्षक रविंद्र पायमल यांच्या नेतृत्वाखाली विशेष कारवाई करण्यात आली. कारवाईदरम्यान वाहनचालकांना उच्च न्यायालयाच्या आदेशाची तसेच वाहतूक नियमांची माहिती देण्यात आली.रविंद्र पायमल यांनी नागरिकांना बसस्थानकाच्या २०० मीटर परिसरात वाहने उभी न करण्याचे आवाहन केले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांवर यापुढेही दंडात्मक कारवाई सुरू राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.बसस्थानक परिसरात शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण करण्यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. वाहतूक नियमांचे काटेकोर पालन झाल्यास वाहतूक कोंडी कमी होऊन प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत होईल, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आहे.

# इथेनॉल मिश्रित पेट्रोलमुळे वाहनधारक त्रस्त

प्रतिनिधी १९ जुलै



**दिग्रस :** दिग्रस शहरासह तालुक्यात पेट्रोलमध्ये वाढत्या इथेनॉल मिश्रणामुळे वाहनांमध्ये तांत्रिक बिघाड होत असल्याच्या तक्रारी वाढत आहेत. इंजिनची कार्यक्षमता कमी होणे, वाहन सुरू होण्यास अडचण, मायलेज घटणे, फ्युएल पंप व इंजेक्टरमध्ये बिघाड होणे, तसेच देखभाल खर्च वाढल्याने वाहनधारकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

पेट्रोलचे दर आधीच उच्चांकी पातळीवर असताना वारंवार होणाऱ्या दुरुस्तीमुळे आर्थिक भार वाढल्याचे वाहनचालकांचे म्हणणे आहे. ग्रामीण भागातील नागरिक दैनंदिन प्रवासासाठी दुचाकींवर अवलंबून असल्याने त्यांना या समस्येचा अधिक फटका बसत असल्याचे दिसून येत आहे.

पर्यावरणपूरक इंधन धोरणाला विरोध नसला तरी त्याचे दुष्परिणाम सर्वसामान्य वाहनधारकांवर पडू नयेत, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. इथेनॉल मिश्रणामुळे वाहनांवर होणाऱ्या परिणामांबाबत शासन, तेल कंपन्या आणि वाहन उत्पादकांनी स्पष्ट मार्गदर्शक सूचना द्याव्यात, तसेच तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी मागणी वाहनधारकांनी केली आहे. इंधनाच्या गुणवत्तेची स्वतंत्र तपासणी, वाहनांवरील परिणामांचा सखोल अभ्यास आणि आवश्यक असल्यास इथेनॉल मिश्रण धोरणाचा फेरविचार करण्याची मागणी दिग्रसमधील नागरिकांनी केंद्र व राज्य सरकारकडे केली आहे. पर्यावरण संरक्षणाबरोबरच वाहनधारकांचे आर्थिक हितही जपले जावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पावसाने फिरवली पाठ; कोरड्या दुष्काळाचे सावट

प्रतिनिधी १९ जुलै

**उमरखेड :** जूनपासून समाधानकारक पाऊस न झाल्याने उमरखेड तालुक्यात खरीप हंगाम गंभीर संकटात सापडला आहे. पेरणीनंतर पावसाने दडी मारल्याने सोयाबीन, कपाशी आणि हळदीची पिके करपू लागली असून महागडी बियाणे व खते वापरूनही पिकांना पाणी मिळत नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवसही पावसाची शक्यता नसल्याचे वर्तविल्याने कोरड्या दुष्काळाचे सावट अधिक गडद झाले आहे.जूनअखेरीस झालेल्या अल्प पावसावर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर पेरणी केली. सुरुवातीला काही ठिकाणी उगवण चांगली झाली; मात्र त्यानंतर पावसाने ओढ दिल्याने पिके सुकू लागली आहेत. जमिनीतील ओलावा संपल्याने अनेक शेतांमध्ये भेगा पडल्या असून पिके वाचविण्याचे मोठे आव्हान शेतकऱ्यांसमोर उभे राहिले आहे.

खरीप हंगामासाठी अनेकांनी कर्ज काढून किंवा उसनवारी करून बियाणे व खते खरेदी केली होती. आता ही गुंतवणूक वाया जाण्याची भीती निर्माण झाली असून संपूर्ण वर्षाच्या उत्पन्नाबाबत अनिश्चितता वाढली आहे. आणखी काही दिवस पाऊस न झाल्यास उभी पिके पूर्णपणे नष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.दरम्यान, पावसाच्या दीर्घ खंडाचा परिणाम ग्रामीण अर्थव्यवस्थेवरही दिसून येत आहे. शेतकऱ्यांच्या हातात पैसा नसल्याने तालुक्यातील बाजारपेठा ओस पडल्या आहेत. वातावरणातील बदलामुळे सर्दी, ताप, खोकला तसेच उलट्या-जुलाबाच्या रुग्णांमध्येही वाढ झाली आहे. शेतीचे नुकसान आणि वाढता आरोग्य खर्च यामुळे ग्रामीण भागातील नागरिक दुहेरी संकटाचा सामना करत आहेत.शेतकऱ्यांनी शासनाने तातडीने परिस्थितीचा आढावा घेऊन आवश्यक मदत, पीक पाहणी आणि दुष्काळी उपाययोजना सुरू करण्याची मागणी केली आहे. खरीप हंगाम वाचविण्यासाठी आता सर्वांच्या नजरा आभाळाकडे लागल्या आहेत.

# ऊन, वारा, पावसात प्रवाशांची परवड; दिग्रसला आधुनिक प्रवासी निवारे कधी?

प्रतिनिधी १९ जुलै

**दिग्रस :** दिग्रस शहरातील नवीन बसस्थानक शहराच्या एका टोकाला असल्याने विविध भागांतील प्रवाशांना एसटी बसची प्रतीक्षा करताना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. शहरातील प्रमुख ठिकाणी प्रवासी निवाऱ्यांचा अभाव असल्याने उन्हाळ्यात कडक ऊन, पावसाळ्यात मुसळधार पाऊस तर हिवाळ्यात थंडीचा त्रास सहन करावा लागत असून, तातडीने आधुनिक प्रवासी निवारे उभारण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

छत्रपती शिवाजी महाराज चौक, शंकर टॉकीज परिसर, देव नगर, लाठीवाला पेट्रोल पंपासमोर, आर्णी बायपास पुलालगत आणि आर्णी रोड बायपास वळण या ठिकाणी दररोज शेकडो विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक, कामगार आणि प्रवासी बसची वाट पाहत उभे असतात. मात्र बहुतांश ठिकाणी साधा निवाराही नसल्याने नागरिकांना उघड्यावरच थांबावे लागत आहे.

प्रवासी निवारे उभारल्यास उन्हापासून, वाऱ्यापासून आणि पावसापासून संरक्षण मिळण्याबरोबरच बसची प्रतीक्षा अधिक सुरक्षित आणि सुसह्य होईल, असे नागरिकांचे म्हणणे आहे. शहराची वाढती लोकसंख्या आणि सार्वजनिक वाहतुकीचा वाढता वापर लक्षात घेऊन संबंधित प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने तातडीने निधी उपलब्ध करून आधुनिक प्रवासी निवारे उभारावेत, अशी मागणी होत आहे. "प्रवाशांची गैरसोय थांबवा; दिग्रसला आधुनिक प्रवासी निवाऱ्यांची गरज आजची आहे, उद्याची नाही," अशी भावना दिग्रसकर नागरिकांनी व्यक्त केली आहे.

# जिजामाता कला महाविद्यालयात 'प्राचीन भारतीय संस्कृती' विषयावरील ब्रिज कोर्स

प्रतिनिधी १९ जुलै



**दारव्हा :** स्थानिक जिजामाता कला महाविद्यालयाच्या इतिहास विभागामार्फत बी.ए. भाग-१ च्या विद्यार्थ्यांसाठी 'प्राचीन भारतीय संस्कृती' या विषयावर ब्रिज कोर्सचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यादव सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

ब्रिज कोर्समध्ये विद्यार्थ्यांना प्राचीन भारतीय संस्कृती, चालीरीती, परंपरा, सामाजिक मूल्ये, देवाण-घेवाणीची संस्कृती आणि मान-सन्मान यांसारख्या विषयांची माहिती देण्यात आली. भारतीय संस्कृतीचा वारसा जतन करून त्याचे संवर्धन करण्याची गरज असल्याचे मार्गदर्शन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन इतिहास विभागप्रमुख डॉ. रामधन हिरे यांनी केले. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. जयवंत जुकरे, डॉ. राजेश गेडाम, डॉ. पुरुषोत्तम बांडे, डॉ. प्रीती ठाकरे, डॉ. रूपाली कणसे तसेच शिक्षकेतर कर्मचारी नितेश कदम, सचिन माटोडे, सतीश सरतापे, विनोद कंटाळे आणि सोमराज लोहकरे यांनी सहकार्य केले.

# गांजासह तरुण अटकेत

प्रतिनिधी १९ जुलै



**वणी :** वणी शहरात अंमली पदार्थांच्या विक्रीवर आळा घालण्यासाठी राबविण्यात आलेल्या मोहिमेत गुन्हे शोध पथकाने एका तरुणाला गांजासह अटक केली. आरोपीकडून सुमारे ३७० ग्रॅम गांजा, रोख रक्कम आणि गुन्ह्यात वापरलेला मोबाईल असा एकूण २८ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस निरीक्षक भानुदास पिदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथक शहरात गस्त घालत असताना एकतानगर येथील नगरपरिषद कॉम्प्लेक्सजवळ एक व्यक्ती गांजाची विक्री करण्यासाठी थांबला असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून संशयिताला ताब्यात घेतले. चौकशीत संशयिताचे नाव सुजल मंगेश गोहोकार (वय २०, रा. एकतानगर, वणी) असे निष्पन्न झाले. त्याच्या ताब्यातील पिशवीची तपासणी केली असता ३७० ग्रॅम गांजा, गांजा विक्रीतून मिळालेली रोख रक्कम आणि एक मोबाईल असा एकूण २८ हजार ८८० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. याप्रकरणी आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी रॉबीन बन्सल आणि पोलीस निरीक्षक भानुदास पिदुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत गुन्हे शोध पथकातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# अवैध मुरूम उत्खनन प्रकरणी सुकळी येथील उपसरपंच शिवाजी रावते अपात्र

प्रतिनिधी १९ जुलै




**उमरखेड :** उमरखेड तालुक्यातील सुकळी (ज.) ग्रामपंचायतीचे प्रभारी सरपंच तथा उपसरपंच शिवाजी सदाशिव रावते यांना अवैध मुरूम उत्खनन आणि आर्थिक अनियमिततेच्या प्रकरणात महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५९ च्या कलम ३९(१) अन्वये उपसरपंच, प्रभारी सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्यपदासाठी अपात्र घोषित करण्यात आले आहे. अमरावती विभागाच्या अपर आयुक्तांनी १४ जुलै रोजी हा आदेश दिल्याने तालुक्यात राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

तक्रारदाराने दाखल केलेल्या अर्जानुसार, रावते यांनी प्रभारी सरपंच म्हणून कार्यरत असताना मौजा सुकळी (ज.) येथील सर्वे क्रमांक १३२ मधून नियमबाह्य पद्धतीने मुरूम उत्खनन करून त्याची विक्री केली. तसेच १४ वा व १५ वा वित्त आयोगाच्या निधीच्या वापरात अनियमितता आणि कथित बनावट स्वाक्षऱ्यांच्या आधारे आर्थिक व्यवहार केल्याचे आरोप करण्यात आले होते.

चौकशीत चंद्रपूर येथील ईटीएसच्या अहवालात ३,५५६ ब्रास अवैध मुरूम उत्खनन झाल्याचे नमूद करण्यात आले. तहसीलदारांनी ८३९ ब्रास उत्खनन ग्राह्य धरून ६२ लाख ९२ हजार ५०० रुपयांचा दंड ठोठावला होता. हाक दंड उपविभागीय अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांनी कायम ठेवल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांनी अपर आयुक्तांकडे अपात्रतेची शिफारस केली होती.

सुनावणीदरम्यान दोन्ही बाजूंचे युक्तिवाद, चौकशी अहवाल आणि उपलब्ध पुरावे विचारात घेऊन अपर आयुक्तांनी रावते यांनी कर्तव्यात कसूर व अनियमितता केल्याचे स्पष्ट झाल्याचे नमूद केले.

# जुगार अड्ड्यावर छापा, गॅस सिलेंडरच्या काळाबाजारप्रकरणी गुन्हा

प्रतिनिधी १९ जुलै




**महागाव :** महागाव पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे दोन वेगवेगळ्या ठिकाणी धडक कारवाई करत अवैध जुगार अड्ड्यावर छापा टाकून चौघांना ताब्यात घेतले, तर घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार करणाऱ्या एका हॉटेल चालकाविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल केला.

नांदगावण शेतशिवारात ५२ पत्त्यांचा जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी १७ जुलै रोजी छापा टाकला. या कारवाईत मारोती कदम, चेतन टमके, अताउल्ला खान पठाण (सर्व रा. महागाव) आणि रवि जाधव (रा. तोंडा, ता. हदगाव) यांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्या ताब्यातून ३ हजार ८१० रुपयांची रोख रक्कम जप्त करण्यात आली. याप्रकरणी महागाव पोलिस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसऱ्या कारवाईत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील खडका फाट्याजवळील 'हॉटेल शिवनेत' येथे छापा टाकण्यात आला. पांडुरंग मारोती गायकवाड (रा. खडका) हा घरगुती वापरासाठी असलेल्या एचपी कंपनीच्या गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर करून काळाबाजार करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्याच्याकडून दोन गॅस सिलेंडर, गॅस भट्टी व गॅस शिगडी असा १९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी अत्यावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अमर मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे, उपनिरीक्षक किशोर मुरकुटे तसेच पोलिस पथकाने ही कारवाई केली. अवैध धंद्यांविरोधातील कारवाया यापुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.



**माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या विरोधात अमरावतीत भाजपा एकवटली , राज्यसभा खासदार अनिल बोंडे, विधान परिषद आमदार प्रवीण पोटे यांच्या घोषणा.**

# मेळघाटातील आदिवासींच्या विकासासाठी समन्वयाने काम करावे- प्रा. डॉ. अशोक उईके

प्रतिनिधी १९ जुलै



**अमरावती:** मेळघाटातील कुपोषण, बालमृत्यू, मातामृत्यू दूर करणे हे शासनाचे मुख्य उद्दिष्ट असून यासाठी आरोग्य यंत्रणा सक्षमपणे काम करीत आहे. येथील सामाजिक संस्थांनी जिल्हा प्रशासनासोबत योग्य समन्वय साधून याबाबत कार्य करण्याचे निर्देश आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांनी दिले. आरोग्य प्रशिक्षण केंद्र चिखलदरा येथे आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली धारणी व चिखलदरा तसेच इतर क्षेत्रातील विविध विषयांचा आढावा घेण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.

आमदार केवलराम काळे, माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, प्रकल्प अधिकारी सिद्धार्थ शुक्ला, आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त संदीप गोलाईत, आदिवासी महामंडळाच्या महाव्यवस्थापक श्रीमती जयरेखा, उपसंचालक सुशील वाकचौरे आधी यावेळी उपस्थित होते.

आदिवासी विकास मंत्री श्री. उईके म्हणाले, मेळघाटामध्ये बालविवाहामुळे माता आणि बालकांच्या कुपोषणासारख्या आरोग्य तक्रारी निर्माण होतात. तसेच दोन मुलांमध्ये पुरेसे अंतर नसणे हे देखील कुपोषणाचे कारण आहे. यासाठी प्रशासनासोबतच अंगणवाडी सेविका आणि आशावर्कर कार्य करीत असतात. यावर अधिक भर देऊन बालविवाह थांबवण्यासाठी सर्वांनी सामाजिक दायित्व सांभाळून मिशन मोडवर याबाबत जनजागृती करावी. मेळघाटामध्ये पुरेसा औषधसाठा नसल्यामुळे कोणाच्याही प्रकृतीला धोका निर्माण होऊ नये, यासाठी आरोग्य विभागाने दक्षता बाळगावी. या भागामध्ये जलजीवन मिशनअंतर्गत पाणीपुरवठा योजना सक्षमपणे राबवावी, असे आदिवासी विकास मंत्री. डॉ. उईके म्हणाले.

मेळघाटातील आदिवासींचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रशासनामार्फत विविध उपाय योजना राबविण्यात येतात. याच धर्तीवर येथील सामाजिक संस्था देखील कार्य करीत असतात. परंतु त्या स्वतंत्रपणे काम करीत असतात. यापुढे प्रशासनाच्या पूर्वपरवानगी व समन्वय साधून सामाजिक संस्थांनी काम करावे तसेच या क्षेत्रात जनजागृतीसाठी वापरण्यात येणाऱ्या प्रचार साहित्याचे शासनामार्फत प्रमाणीकरण करण्यात यावे. आदिवासी बहुल क्षेत्राचा विकास साधण्यासाठी शासनासमवेत सामाजिक संस्थांनी समन्वय साधून काम करावे.

यावेळी उईके यांनी महिला व बालकल्याण विभाग व त्यांच्या योजना, पाणीपुरवठा व्यवस्थापन, आरोग्य विभाग या विषायांवर संबंधितांशी चर्चा केली. शासन आणि प्रशासनाच्या सहकार्याने या भागातील कुपोषण हटवायचे आहे.

# दर्यापुरात पावसाच्या हलक्या सरी

प्रतिनिधी १९ जुलै

**अमरावती :** गेल्या दहा ते पंधरा दिवसापासून पावसाने दडी दिली आहे. त्यामुळे कपाशी व सोयाबीन पिके धोकात आली असून दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर आले आहे.

अशातच शेतकऱ्यांचे लक्ष वरुण राजाकडे लागले आहे. मात्र गेल्या आठवड्यापासून साधे ढगाळ वातावरण ही निर्माण झाले नाही. अशातच शनिवारी दुपारी तीन वाजता च्या दरम्यान दर्यापूर शहरात ढगाळ वातावरणासह पावसाच्या हलक्या सरी बसल्याने शेतकऱ्यांमध्ये आशेचे किरण म्हणून पावसाच्या सरी पडल्याने एक आनंद निर्माण झाला होता. मात्र ज्या शेतकऱ्यांनी शेती पेरली आहेत. त्यांना दमदार पावसाची शक्यता आहे. असे अनेक शेतकरी आहेत की ज्यांनी पेरणीस केली नाही. अशांना पेरणीयोग्य पावसाची आवश्यकता आहे. गेल्या चार ते पाच दिवसापासून दमट वातावरण आहे. आज पावसाच्या सरी बरसल्याने वातावरणात गारवा निर्माण झाला होता.

# जिल्ह्यातील 7.50 मीटर रस्त्यावरील ले- आऊटधारकांसाठी दस्त नोंदणीची प्रक्रिया पूर्ववत सुरु

प्रतिनिधी १९ जुलै

## आ.सुलभा खोडके यांच्या पाठपुराव्याला यश



**अमरावती:** अमरावती जिल्ह्यातील सन २०२० नंतर मंजूर ७.५० मीटर रस्त्यावरील ले-आऊटधारकांसाठी खरेदी-विक्री व दस्त नोंदणी प्रक्रिया केवळ ईडब्लूएस राखीव आरक्षणाच्या नावाखाली बंद करण्यात आल्याने अमरावती जिल्ह्यातील भूखंडधारकांमध्ये रोष व्यक्त होत आहे. सदरची दस्त नोंदणीची प्रक्रिया पूर्वीप्रमाणेच विनाविलंब पूर्ववत सुरु करण्यासंदर्भात अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी नुकत्याच झालेल्या राज्यविधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात औचित्याचा मुद्दा उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले. याबाबत शासनाने तात्काळ दखल घेत कार्यवाही केल्याने आता सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांनी ७.५० मीटर रस्त्यावरील ले-आऊटधारकांसाठी खरेदी-विक्री व दस्त नोंदणी प्रक्रिया पुर्ववत सुरु केली असल्याने शेकडो भूखंडधारकांना दिलासा मिळाला आहे. अमरावती शहरात व ग्रामीण भागात सन २०२० नंतर मंजूर झालेल्या एकूण लेआउटपैकी जवळपास ७० टक्के लेआउट हे ७.५० मीटर रस्त्यावरील आहेत. ज्यामध्ये एकत्रित इमारत बांधकाम नियमावली मधील तरतुदीनुसार ७.५० मीटर रस्त्यावरील भूखंड हे आर्थिक दुर्बल घटकासाठी (ईडब्लूएस ) आरक्षित नसून सदर युडीसीपीआर नियमावली तरतुदीनुसार ३-३-२ मधील सी ग्रुप हाऊसिंग स्कीमसाठी १५० मीटर लांबीच्यावर देता येण्याबाबत स्पष्ट नमूद आहे. तसेच हे ७.५० मीटर रस्त्यावरील भूखंड हे केवळ ईडब्लूएस प्रवर्गाकरिताच राखीव ठेवावे ,असा कोणताहि उल्लेख हा एकत्रित इमारत बांधकाम नियमावलीमध्ये ( युडीसीपीआर ) नसतांना किंवा केंद्र अथवा राज्याच्या कोणत्याही कायद्यात नसतांनाही सह जिल्हा निबंधक वर्ग-1 तथा मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांच्या कार्यालयाकडून दिनांक १३ मे २०२६ रोजी पत्र काढून ७.५० मीटर ले -आऊट मधील प्लॉट चे खरेदी -विक्री व दस्त नोंदणीचे काम अचानक थांबविण्यात आले होते. या अटींच्या तर्क वितर्कामुळे भूखंडधारकांना मोठ्या व्यावहारिक अडचणी निर्माण झाल्या असून त्यांच्यात रोष सुद्धा निर्माण झाला.

# ऑपरेशन कवच: साडे चार कोटींच्या गांजाची होळी

प्रतिनिधी १९ जुलै

## अमरावती ग्रामीण पोलिसांची कामगिरी



**अमरावती :** पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी ऑपरेशन कवच दरम्यान जिल्हयातील अमली पदार्थाच्या अवैध उत्पादन वाहतुक, साठवण, विक्री व सेवनाला आळा घालण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या विशेष अभियाना अंतर्गत अमली पदार्थाविरुध्द विशेष शोध व कार्य, संशयीत ठिकाणावर छापे, युवकांमध्ये जनजागृती व व्यसन मुक्तीचा संदेश, नागरीकांच्या सहकार्याने गुन्हे रोखण्याचा प्रयत्न, सुरक्षित व्यसनमुक्त आणि सशक्त समाज निर्माण करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात येत आहे.

अमरावती ग्रामीण जिल्हयात अमली पदार्थ विरोधात ऑपरेशन कवच राबविण्यात आले होते. सदर ऑपरेशन दरम्यान समाजात अमली पदार्थ विरोधात जनजागृती निर्माण व्हावी समाज अमली पदार्थ आहारी जावू नये याकरीता विविध उपक्रम राबविण्यात आले होते. तसेच ऑपरेशन कवच दरम्यान अमरावती ग्रामीण पोलीसांनी अमली पदार्थ विरोधात केलेल्या कार्यवाही मध्ये जप्त केलेला मुद्देमाल सुध्दा नाश करण्याची प्रक्रिया राबविण्यात आली. सदर मुद्देमाल नाश करण्याची परवानगी ही महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ मुंबई यांचेकडून प्राप्त झाली होती. त्यानुसार महाराष्ट्र इन्व्हायरो पावर लि. कंपनी, एमआयडीसी बुटीबोरी नागपुर येथे सदरचा मुद्देमाल नाश करण्यात आला आहे. अमरावती ग्रामीण जिल्हयात विविध पोलीस स्टेशन मध्ये जप्त असलेला एकुण ४७ गुन्हयातील मुद्देमाल ज्याचे वजन एकुण १४८६ कि.ग्रॅ. तसेच कि.अं. ४,४५,८०,००० रु. मुद्देमाल नाश करण्यात आला.

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक निकेतन कदम,.अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक (पो. मुख्या) किरण वानखडे, पोलीस निरीक्षक स्थागुशा अशोक लांडे, पोउपनि सागर हटवार व अंमलदार यांनी केली.

# पोलिसांनी पकडली अवैध रेती

प्रतिनिधी १९ जुलै



**अमरावती :** 17.07.2026 रोजी सकाळी 5.30 वा दरम्यान गुप्तबातमीदारा कडुन खबर मिळाली की, मध्य प्रदेशातुन काही ट्रक अवैद्यरित्या रेती भरुन घेवुन येत आहे. अशा माहीती वरुन पोनि अशोक जाधव सोबत पो. हवा संतोष बजारी, पो. हवा मनोज वानखडे, पोकॉ राहुल केन्डे, असे मिळुन खबऱ्याने सांगीतल्या नुसार जायन्ट चौक वरुड येथे अवैद्य रेती वाहतुक चे वाहना संबंधाने नाकाबंदी करीत असतांना सकाळी 07.15 वाचे दरम्यान पांढुर्णा रोडने 04 निळया रंगाचे डंपर येतांना दिसुन आले. त्यांना सोबत असलेल्या पोलीस स्टॉफचे मदतीने थांबवुन सदर डंपरची पाहणी केली असता डंपर मध्ये रेती असल्याचे दिसुन आल्याले 4 डंपर चौकशी करीता पोलीस स्टेशनला आणुन 4 डंपरचे चालकाकडे अधिक चौकशी केली असता डंपर चालकाकडे रेतीचे वाहतुकीचा परवाना रायल्टी मिळुन आली नाही. तसेच डंपर चालंकानी वाहन मालकाचे सांगण्यावरुन मध्य प्रदेशातुन अवैद्य रित्या रेतीचे उत्खन्न करुन चोरुन रेतीची मोर्शी येथे घेवुन जातांना मिळुन आल्याने डंपर MH 27 BX 9747 चा चालक नामे पवन मोहन शर्मा वय 39 वर्ष रा. जयस्तभं चौक,, MH 27 DT7792 चा चालक नामे पवन सुखदेव नांदणे वय 27 वर्ष रा. खंबीत बेलोरा, ता. आष्टी जि. वर्धा, MH 27 DT7553 चा चालक प्रफुल अशोक खरबडे वय 35वर्ष रा. खंबीतबेलोरा, ता. आष्टी, जि. वर्धा, MH 27 BX 9559 चा चालक नामे आर्यन गजाननराव परतेकी वय 22 वर्ष रा. जिजाउ नगर मोर्शी यांचे ताब्यातुन 04 डंपर मध्ये 7 ब्रास रेती प्रत्येकी ब्रास रेती 5000 रुपये असे एकुण एकुण 28 ब्रास रेती किं अ 1,40,000 रुपये व प्रत्येकी डंपर किंअ 42,00,000 असे एकुण 04 डंपर किअंम 1,68,00,000 रुपये असे एकुण 1,69,40,000 रुपयाचा माल नमुद डंपरचे चालका कडुन पंचासमक्ष जप्त करण्यात आला आणि नमुद डंपरचे चालक शर्मा वय 39 वर्ष रा. जयस्तभं चौक, पवन सुखदेव नांदणे वय 27वर्ष रा. खंबीत बेलोरा, ता. आष्टी जि. वर्धा,,प्रफुल अशोक खरबडे वय 35 वर्ष रा. खंबीतबेलोरा, ता. आष्टी, जि. वर्धा, आर्यन गजाननराव परेतेकी वय 22 वर्ष रा. जिजाउ नगर मोर्शी व डंपरचे मालक मनिष सुरेशराव डंदे रा. मोर्शी, मोहीत अविनाश लांडे रा. माळीपुरा मोर्शी, गौरव रामभाउ धोटे रा. सोलब बिल्डींग जवळ मोर्शी, 08) गोलु ऊर्फ शेख बशीर रा. पेठ पुरा मोर्शी यांचे विरुध्द पोलीस सटेशन वरुड येथे अप क्र कलम 303(2), 49 भारतीय न्याय संहीता सहकलम 9,15 पर्यावरण संरक्षण अधिनियम, सहकलम 48 (7), (8) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

# सांगली येथे लिपीक संघटनेची राज्यस्तरीय लिपीक संवाद बैठक उत्साहात संपन्न

प्रतिनिधी १९ जुलै



**अमरावती :** महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपीक संघटनेची राज्यस्तरीय संवाद बैठक सांगली येथील शिवपार्वती मंगल कार्यालय हरिपूर येथे उत्साहात संपन्न झाली.

संवाद बैठकीचे प्रस्ताविक सांगली जिल्हा अध्यक्ष विशाल पाटील यांनी केले. या संवाद बैठकीस राज्यातील एकोणीस जिल्ह्यातील लिपीक पदाधिकारी उपस्थित होते.

लिपीक शिरोमणी बापूसाहेब कुलकर्णी यांनी राज्यातील जिल्हा परिषदांमधील लिपीकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद लिपीक वर्गीय संघटनेची स्थापना केली आहे. या संघटनेची घौडदौड आज संपूर्ण महाराष्ट्रात सुरू असून येणाऱ्या काही दिवसांत कनिष्ठ प्रशासन अधिकारी व सहाय्यक प्रशासन अधिकारी ही दोन पदे एस-१४ मध्ये एकत्र करण्याचा शासन निर्णय निर्गमित होईल. या शासन निर्णयामुळे एकाही लिपीकाचे नुकसान होणार नाही यासाठी लिपीक संघटना कटिबध्द असलेची ग्वाही यावेळी संघटनेचे राज्याध्यक्ष सागर बाबर यांनी दिली.

लिपीकांच्या वेतनत्रुटी पासून लिपीकांचे ग्रेड वेतन वाढविणे त्यानंतर लिपीकांचे पदोन्नती टप्पे कमी करणे यानिरणयापर्यंत संघटनेचा झालेला प्रवास राज्य कोषाध्यक्ष उमाकांत सुर्यवंशी यांनी उपस्थितांसमोर मांडला. राज्य कोषाध्यक्ष उमाकांत सुर्यवंशी यांनी संघटनेची ध्येयधोरणे व संघटना राज्यस्तरावर करत असलेले प्रयत्न याची सविस्तर माहिती दिली. तसेच येणाऱ्या एक दोन महिन्यात भव्यदिव्य असे राज्यस्तरीय लिपीक अधिवेशन सांगली येथे घ्यायचे आहे त्यासाठी महाराष्ट्रातून किमान ७००० लिपीक उपस्थित होणार असून त्यासाठी संघटना कोष वाढविणे गरजेचे असलेचे प्रतिपादन यावेळी राज्य कोषाध्यक्ष उमाकांत सुर्यवंशी यांनी केले.

# भटक्या श्वानाच्या हल्ल्यातील जखमी सनिधीच्या प्रकृतीबाबत आ. सुलभा खोडके यांची विचारणा

प्रतिनिधी १९ जुलै

## सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे भेट देऊन कुटुंबीय व डॉक्टरांशी साधला संवाद



**अमरावती:** अमरावतीच्या रुख्मिणी नगर स्थित साई हॉस्पिटल जवळ सनिधी सचिन कावरे नामक १० वर्षीय मुलीवर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये शस्त्रक्रिया करण्यात आली. आज शनिवार दिनांक 18 जुलै 2026 रोजी अमरावतीच्या आमदार सुलभा खोडके यांनी रुग्णालयात जाऊन सनिधीच्या प्रकृतीबाबत मोठ्या आस्थेने विचारणा केली. यावेळी विधान परिषद आमदार - संजय खोडके देखील उपस्थित होते. यावेळी आमदार महोदयांनी सनिधीवर उपचार करणाऱ्या डॉक्टर्स व सर्व टीमसोबत संवाद साधला. यावेळी सुपर स्पेशालीटी हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक - डॉ. अमोल नरोटे , सर्जन डॉ. विक्रांत कुळमेथे यांनी सनिधीच्या मेडिकल अपडेट बाबत माहिती दिली. सनिधी हिच्यावर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये प्लास्टिक सर्जन डॉ. सागर भुतडा यांनी यशस्वी शस्त्रक्रिया केली असून तिच्यावर आयसीयूमध्ये उपचार सुरु आहे. तिच्या प्रकृतीत सुधारणा असून ती वैद्यकीय टीमच्या चोवीस तास निगराणीमध्ये असल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. यावेळी आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी सनिधी ची आई-सौ.दीपा व वडील-सचिन कावरे यांची भेट घेऊन घटनाक्रम जाणून घेतला. सनिधी हि तिसऱ्या वर्गात शिकत असून ती अमरावती स्थित विद्यानिकेतन शाळा, राम नगर-अमरावती येथील विद्यार्थिनी आहे.

# श्री. हनुमान गढी अमरावती येथे माजी खासदार नवनित राणा, आ.रवि राणा यांचे हनुमान चालिसा पठन

## शेतकरी मजबुत व्हावा, सुख समृध्द व्हावा याकरीता हनुमान चालिसा पठनाव्दारे केली प्रार्थना

प्रतिनिधी १९ जुलै



**अमरावती :** नागपुर येथे येवुन जनाब उध्दव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या घराजवळ रामरक्षा वाचण्याची केली फक्त नौटंकी असून रामरक्षा नव्हे तर पक्षरक्षा करण्याचे काम उध्दव ठाकरे करत आहे – स्वत: मुख्यमंत्री असतांना जनाब उध्दव ठाकरे यांनी मला स्वत:ला व आ.रवि राणा यांना हनुमान चालिसा वाचण्याकरीता मनाई करुन राजद्रोहाचा गुन्हा दाखल करुन 14 दिवसाकरीता जेलमध्ये टाकले त्यामुळे हनुमान चालिसा वाचु न देण्याचे परीणाम म्हणजे पक्ष गेला, सत्ता गेली, आमदार गेले, नगरसेवक, खासदार ही गेले व जनतेने सुध्दा जागा दाखवुन दिली. असा आरोप माजी खासदार नवनीत राणा यांनी केला.

उध्दव ठाकरे यांनी कटप्पा सारखा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठीत खंजीर खुपसला. जनाब उध्दव ठाकरे यांनी नागपुरमध्ये येऊन मुख्यमंत्र्याच्या घरासमोर रामरक्षा पठनाचे वाचन करीत आहे. मुख्यमंत्र्यानी त्यांचे स्वागतच केले. अयोध्येमध्ये प्रभु रामचंद्राच्या जन्मभुमीत मंदिराचे लोकार्पण होत असतांना सर्व रामभक्त तेथे उपस्थित होते तेव्हा उध्दव ठाकरे कुठे होते? रामलल्ला च्या दर्शनाला सुध्दा उध्दव ठाकरे गेले नाही आता मात्र रामरक्षा पठणाची नोटंकी करीत आहे. उध्दव ठाकरे यांनी नागपुर मध्ये प्रथम रेशम बाग मध्ये जाऊन संघ कार्यालयात दर्शन घ्यावे तसेच वेळात वेळ काढुन अमरावती येथील हनुमान गढी येथे 151 फुट उंचीचा हनुमान मुर्तीचे दर्शन घेऊन हनुमान चालिसा म्हणा आम्ही तुमचे स्वागतच करु. मुख्यमंत्र्याना व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना आज जरी म्हटले की,तुमच्या घराजवळ हनुमान चालिसा म्हणतो तरी ते तुमची चांगली व्यवस्था करुन स्वागतच करतील. रामाचे विचार ठेवणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे खरे रामभक्त असल्याचे आ.रवि राणा म्हणाले. अमरावती येथील श्री हनुमान गढी येथे आज हजारो हनुमान भक्तांच्या उपस्थितीत भाजपा नेत्या तथा माजी खासदार सौ. नवनित राणा आणि आ. रवि राणा यांनी सामूहिक हनुमान चालीसा पठण करून राज्यातील शेतकरी सुखी, समृद्ध व आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत तसेच वरुणराजाची कृपा होऊन सर्वत्र समाधानकारक पाऊस पडावा, अशी प्रार्थना केली. यावेळी उपस्थित भाविकांना संबोधित करताना माजी खासदार नवनित राणा यांनी नागपूर येथे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निवासस्थानासमोर केलेल्या रामरक्षा पठणावर टीका केली.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

रविवार, दि.१९ जुलै २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



रोजगार हमी, अर्धे तुम्ही अर्धे आम्ही, नव्हे 'पुर्णच आम्ही'....

# भ्रष्टाचाराची चतु:सुत्री, रोजगार हमी कागदोपत्री !

*** कागदोपत्री झाले नाले सरळ * जुन्याच विहिरी दाखवून काढले पैसे *मजुराच्या नावे बँकेत बोगस खाते * अल्पवयीन मुलाना दाखविले मजुर**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात रोजगार हमी योजनेत अर्धे आम्ही आर्धे तुम्ही नव्हे तर पुर्णच आम्ही असा प्रकार घडला. अनेक नाला सरळीकरणाचे कामे कागदोपत्रीच झाले. तर जुन्या विहिरींना दाखवून पैसे काढल्याच्या तक्रारी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झाल्या आहेत. या प्रकरणाची चौकशी सुरू असून काय कारवाई होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मालेगाव तालुक्यातील रोजगार हमीच्या भ्रष्टाचार झाला ४ गटविकास अधिकारी, कर्मचारी, रोजगार सेवकांसह १६४ जणांवर गुन्हे दाखल झाले. नंतर जिल्ह्यात रोजगार हमी योजनेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला. याच्याअनेक तक्रारी जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त आहेत. अद्याप मात्र कोणतीही कारवाई न झाल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

जिल्ह्यातील १० वर्षात ३०० कोटी पेक्षा अधिक रोजगार हमी योजनेत भ्रष्टाचार झाला आहे. रोजगार हमी योजनेचे विहिर, शेततळे, वृक्षारोपण, नालाखोलीकरण सर्व कामे कागदोपत्री दाखवून मजुराच्या नावे लाखो रूपयाचे बिल काढल्याचे मालेगाव तालुक्यातील वाघळूद ते बोरगाव येथे उघडकिस आले आहे. या व्यतिरीक्त जिल्ह्यात इतरही ग्रामपंचायतीमध्ये करोडोचा भ्रष्टाचार होवूनही अधिकाऱ्याच्या संगणमताने प्रकरण रफातफा करण्याची तयारी सुरू आहे. तालुक्यातील सर्वच गावात गेल्या १० वर्षात गावांतर्गत खडीकरण, पांदण रस्ते, वृक्षलागवड नाममात्र करून मोठया प्रमाणात रक्कमा उकळल्याचा संशय असून मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याची माहिती समोर येत असून दबक्या आवाजात पंचायत समितीच्या आवारात याची मोठी खमंग चर्चा होत आहे, कामे न करताच मी बिले कशी काढली याची चढाओढ स्वयंघोषित कंत्राटदार यांच्यात लागली असून धाब्यावर हसून चर्चा होताना दिसत आहे.मनरेगा अंतर्गत गावात कामे करून गावातील रोजगार सेवकाला हाताशी धरून न झालेल्या कामाची तसेच नाममात्र केल्याची कामाची बिले काढल्याची माहिती मिळाली आहे. यापूर्वी सुद्धा काही गावातील नागरिकांनी तक्रारी करून गावातील जेष्ठ नागरिक, लहान मुले, १० एकर शेती असलेले शेतकरी व मृत्यू झालेल्या लोकांच्या नावाने बिले काढल्याची खात्रीशीर माहिती आहे.तसेच जे मजूर दाखविले आहेत त्यांना माहितीच नाही की आपण कोणत्या कामावर काम करत आहोत.त्याचे एटीएम स्वयंघोषित कंत्राटदार यांनी अगोदरच जवळ घेऊन ठेवले होते किंवा काही मिनी एटीएम ज्यांच्याजवळ आहेत. त्या लोकांना गावात आणून त्याचे अंगठे घेऊन मोठया प्रमाणात रक्कमा काढण्यात आल्या आहेत.याची चौकशी करण्याची गरज असून मोठया प्रमाणात भ्रष्टाचाराचा 'धूर' बाहेर येत असून मालेगांव तालुक्याची मनरेगा तील भ्रष्टाचाराच्या कामाची



## सिंचन 'विहिरीं'चा लेखाजोखाच गायब !

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विहिर बांधकामासाठी अनुदान दिल्यानंतर सदर विहीर व नाला सरळीकरण अस्तित्वात आहे की नाही यासह अन्य बाबींचा अद्ययावत लेखाजोखाच रोजगार हमी योजना विभागाकडे नसल्याची बाब समोर आली आहे. शेतकऱ्यांना सिंचन सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने विविध योजनेंतर्गत सिंचन विहीर व नाला सरळीकरण केल्या जाते. यासंदर्भातील अद्ययावत लेखाजोखा असणे अपेक्षीत आहे. गत काही वर्षापासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या सिंचन विहिरींपैकी किती विहिरींना पाणी लागले व किती विहिरींवर विद्युत पंप बसविण्यात आले, विहीर अस्तित्वात आहे की नाही याची अद्ययावत माहिती संकलित करण्यात आली नाही. जिल्हाधिकारी कार्यालयातील रोजगार हमी योजना विभागाकडे पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध नसल्यानेदेखील माहिती संकलित करण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे सांगितले जाते.

## 'सिटी न्युज सुपरफास्ट'चा वृत्त मालिकेतून पाठपुरावा


### ४ गटविकास अधिकाऱ्यासह १६४ जणांवर गुन्हे

मालेगाव तालुक्यात रोजगार हमी योजनेत १०० कोटी रूपयाच्या वर भ्रष्टाचार झाल्याच्या ११३ वृत्ताची वृत्ताची मालिका सिटी न्युज सुपरफास्टने २ ते ३ वर्षात लावून धरली.

त्यामुळे ४ गटविकास अधिकाऱ्यांसह १६४ जणांवर गुन्हे दाखल झाले होते.सिटी न्युज सुपरफास्टने वारंवार वृत्त प्रकाशित करून कारवाईसाठी भाग पाडले. भ्रष्टाचाराचे प्रकरण पुर्ण मालेगाव तालुक्यात वेढल्या गेल्याचे वृत्त मालिकेतून सिटी न्युज सुपरफास्टने प्रकाशित केले. व प्रशासनाचे लक्ष वेधले.प्रशासनाला वृत्त मालिकेतून सिटी न्युज सुपरफास्टनेच कारवाईस भाग पाडले होते.

## रोजगार हमी योजनेत लाच मागण्याच्या वाढल्या तक्रारी





जिल्ह्यात रोजगार हमीचे कामे न करता करोडोचे बिले काढल्या जात आहे. मात्र, जे लाभार्थी इमानदारीने काम करीत आहे. त्यांना भ्रष्टधिकारी लाच मागीत आहे. प्रत्येक कामाचा दाम ठरला आहे. दामाशिवाय कामच होत नाही. वरिष्ठ अधिकारी खालच्या अधिकाऱ्यांकडून व कर्मचाऱ्यांकडून ठरलेल्या रेट नुसार थेट पैसे घेत आहेत. रोजगार हमी योजना ही कागदोपत्रीच राबविल्या जात असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनीच या योजनेला सुरंग लावला आहे. खऱ्या लाभार्थ्यांकडून दाम दिल्याशिवाय काम करीत नाही. शिवाय त्यांना नियमाच्या नावाखाली नियम लावून त्रास देतात तर खोट्या लाभार्थ्यांना हातोहात बिले काढून मोकळे होतात. लाच घेण्याच्या तक्रारी वाढल्या असून अनेक अधिकारी कर्मचारी लाच घेतांना एसीबीच्या जाळ्यात अडकले आहे. यावरून रोजगार हमीत भ्रष्टाचार होत असल्याचे सिध्द झाले आहे.

पुनरावृत्ती होते की काय? अशी शंका येत आहे. वाशीम जिल्ह्यासह रोजगार हमी योजनेत भ्रष्टाचार झाल्याच्या अनेक तक्रारी झाल्या मालेगाव तालुक्यात ८४ गावात चौकशी होवून अनेक अधिकाऱ्यांसह पदाधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल झाले. अशाच प्रकारचा भ्रष्टाचार झाला असून अनेक रोजगार अल्पवयीन मृत पावलेले आहेत. अनेकांच्या नावे शेतजमिनी असूनही त्यांना रोजगार दाखविण्यात आले आहे. या प्रकरणात वरिष्ठांपासून तर रोजगार सेवकापर्यंत सर्वच जण गुंतले आहेत. जिल्ह्यात अधिकारी व पदाधिकारी योजना राबविण्याऐवजी त्या कशा खातायेतील याकडे लक्ष देतात.

## थोडक्यात

### शिवसेना (उबाठा) मंगरूळपीरची कार्यकारी जाहीर !



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

मंगरुळप्पिर उध्दव बाळा साहेब ठाकरे (शिव सेना) ची नुकतीच नव्याने कार्यकारणी जाहिर झाली असुन नव्या व सघटन कोंशल्य व समाजाप्रती आधर असणाऱ्या युवकाना संधी मिळाली असून गाव तिथे शिवसैनिक संकल्प घेऊन शिवसेने मध्ये अनेक युवक नवनिर्वाचित निवा शी जिल्हा प्रमुख सचिन परळीकर, व तालुकाप्रमुख अर्जुन भीमराव सुर्वे यांच्या नेतृत्वात पक्ष प्रवेश करीत आहेत या सर्व नवनिर्वाचित सैनिकांचे खेड्यापाड्यात मोठ्या जल्लोसात सत्कार समारंभ स्वागत होत आहे,

मंगरूळपीर तालुक्यात शिवसेनेचा गड असलेले शेलुबाजार मध्ये युवकांची मोठी फळी निर्माण झाली असून उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गटाला बळ मिळाले आहे. दि १३ जुलै रोजी मानोली येथील गावकऱ्यांच्या वतीने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नवनियुक्त पदाधिकारी निवासी उपजिल्हाप्रमुख सचिनभाऊ परळीकर, तालुका प्रमुख अर्जुन भीमराव सुर्वे, तालुका समन्वयक भागवत शिंदे यांचा सत्कार करण्यात आला.शिवसेनेवर प्रेम करणारा तळागाळातील शिवसैनिक आज ही उद्धव साहेबांच्या पाठीमागे ठामपणे उभा आहे हा विश्वास आज मानोली येथे बघायला मिळाला.शिवसैनिकांचा उत्साह बघून आम्हा नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा आत्मविश्वास नक्कीच वाढला आहे असे शिवसैनिकाच्या उत्साहतून दिसून येत होते.यावेळी रमेश भोयर, नरेंद्र भोयर, गणेश मुळे, युवराज सुर्वे, गजानन राऊत, बालूभाऊ अवगण, विनोद राऊत, महादेवराव गयाने, बंडूभाऊ महाकाळ, गजाननराव महाकाळ, विठ्ठलराव इंगळे, गजानन गयाने, रामराव राठोड, रामभाऊ उकळकर, शिवाजी राऊत, यांच्या सह शिवसैनिक मोठ्या संखेने उपस्थित होते.

### स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र २० जुलैपासून सुरू

**वाशीम :** केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या अधिसूचनेनुसार दि. १ ऑक्टोबर २०२४ पासून सर्व प्रकारच्या व्यावसायिक वाहनांसाठी योग्यता प्रमाणपत्र तसेच योग्यता प्रमाणपत्राचे नूतनीकरण स्वयंचलित वाहन तपासणी केंद्रामार्फत करणे अनिवार्य करण्यात आले आहे. मोटार वाहन कायदा, १९८८ मधील नियम ५६ नुसार व्यावसायिक वाहनासाठी वैध योग्यता प्रमाणपत्र असणे बंधनकारक असून, नियम ३९ नुसार नोंदणीकृत नसलेले वाहन सार्वजनिक रस्त्यावर चालविण्यास मनाई आहे.या अनुषंगाने उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात दि. २० जुलै २०२६ पासून नवीन स्वयंचलित वाहन तपासणी केंद्र कार्यान्वित करण्यात येणार आहे. सुमारे ६९७ चौरस मीटर क्षेत्रफळावर उभारण्यात आलेल्या या केंद्रात १०३ चौरस मीटर क्षेत्रावर कार्यालयाची इमारत असून, दोन तपासणी मार्ग आणि दोन निरीक्षण खड्डे उपलब्ध आहेत. या केंद्रात दररोज सुमारे ८० व्यावसायिक वाहनांची तपासणी करण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

## रेती घाटाचे रखडले लिलाव, चोरट्या रेतीला सोन्याचे भाव !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●








गौण खनिजाबाबत प्रशासनाने कडक निर्बंध घातले असून विशेषतः रेती उपशाकडे विशेष लक्ष दिले जात आहे. तालुक्यातील रेती घाटाचे लिलाव रखडून ठेवण्यात आले आहेत. तरीसुध्दा शेजारच्या लोणार व सेनगाव तालुक्यातून रिसोड तालुक्यात अवैध रेती वाहतूक बिनबोभाटपणे सुरू आहे. रात्रीबेरात्री बिनधास्तपणे रेती वाहतूक सुरू असून, सबंधित प्रशासनाच्या अर्थपूर्ण संबंधातून रेतीमाफिया ' सैराट ' झाले असल्याची चर्चा होत आहे.

परिणामी चोरट्या रेतीचे दर बेभाव झाले असून चोरटी रेती सोन्याच्या भावात विकत असल्याची ओरड होत आहे.त्यामुळे गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांची व रोजगार हमी योजनेअंतर्गत सूरू असलेल्या सिंचन विहीर लाभार्थ्यांची पिळवणूक होत असल्याची विश्वसनीय सूत्रांनी माहिती दिली आहे. या गंभीर बाबीकडे महसूल प्रशासनाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने सर्व सामान्य जनता प्रशासनाप्रती प्रचंड रोष व्यक्त करत आहे.तालुक्यात तळणी येथून लोणार मार्गे व हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव येथून रात्री बेरात्री रिसोड तालुक्यात रेतीची वाहतूक जोमात सुरू असल्याची माहिती हाती आली आहे. सदर अवैध रेती वाहतूक करणारे माफिया रेतीचे अव्वाच्यासव्वा दर लावून गरजवंतांची आर्थिक पिळवणूक करीत असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे. परिणामी शासन गोरगरिबांसाठी राबवित असलेल्या विवीध घराकुलांच्या योजनेतील लाभार्थी हतबल झाले आहेत. अवैध रेतीचे भाव आठ ते दहा हजार प्रतीब्रॉस असल्याने गोरगरीब जनतेसाठी कुवती बाहेरचा ठरत आहे. त्यामुळे अनेक घराकुलांची कामे रेतीअभावी रखडली असून भिंती तर उभारल्या पण छत कसे बांधायचे हा गंभीर प्रश्न गरीब लभार्थ्यांपुढे उभा ठाकला आहे. तीच गत रोजगार हमी योजनेअंतर्गत सूरू असलेल्या सिंचन विहीर लाभार्थ्यांची असल्याचे बोलले जात आहे. पावसाळा तोंडावर आल्याने बहुतांश शेतकरी विहिरीचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी धडपडत आहेत. मात्र रेतीसाठी परवाना मिळत नसल्याचे बोलत आहेत. तर अवैध मार्गाने रेती घेण्यास परवडत नसल्याची ओरड होत आहे. त्यामुळे अनेक कामे अर्धवट अवस्थेत पडून आहेत. या गंभीर बाबीकडे महसूल प्रशासनाने लक्ष घालून अवैध मार्गाने येणाऱ्या चोरट्या रेतीचे भाव नियंत्रित करावेत. जेणे करून सोन्याच्या भावात विकल्या जाणारी रेती गोरगरीब घरकुल लाभार्थ्यांना विकत घेता येईल व रखडलेली कामे पूर्ण करता येतील. अन्यथा चोरट्या मार्गाने होत असलेली अवैध रेती वाहतुकीवर कडक कारवाई करावी अशी मागणी केली जात आहे.

### निगराणी कडक तरीसुद्धा वाहतूक बेधडक

तालुक्यात अवैध रेती वाहतुकीवर अंकुश ठेवण्यासाठी महसूल प्रशासनाने अनेक वाहनांवर दंडात्मक कारवाई केली असल्याचे सर्वश्रुत आहेच. तद्वतच चोरट्या मार्गाने होत असलेल्या अवैध वाहतूकीवर सबंधित प्रशासन रात्रंदिवस पाळत ठेवून असल्याचे बोलले जात आहे. तरीसुद्धा तालुक्यात रात्रीबेरात्री अवैध रेती वाहतूक सुरूच असल्याचे स्पष्ट चित्र समोर येत आहे. परिणामी रेतीतील पाणी मुरते कुठे ? असा सवाल सामान्य नागरिक उपस्थित करीत आहेत.तद्वतच, रेतीमाफियांचे काही दलाल योग्य ती रसद संबंधितांना पुरवित असल्याचा गंभीर आरोप केला जात आहे.परिणामी अवैध रेती वाहतूक बेधडक सुरू असल्याचे बोलले जात आहे. मात्र यात चोरटी रेती सोन्याच्या भावात विकल्या जात असल्याने गोरगरिबांची आर्थिक पिळवणूक होत आहे. या गंभीर बाबीचा सबंधित प्रशासनाने गांभीर्याने विचार करावा अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## रिसोड तालुक्यात एसआयआर मोहिमेत उल्लेखनीय कामगिरी !

**१०० टक्के काम पूर्ण करणारे बीएलओ संदीप मुंडे यांचा गौरव**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत उत्कृष्ट नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी करत रिसोड तालुक्यातील एकलासपूर येथील मतदार यादी भाग क्रमांक २६६ चे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) संदीप मुंडे यांनी गणना प्रपत्रांचे वितरण व माहितीचे संगणकीकरणाचे काम शंभर टक्के पूर्ण केले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल त्यांचा माननीय मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर तसेच तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी मुंडे यांचे अभिनंदन करून विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेतील त्यांचे कार्य इतर मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. नियोजनबद्ध कार्यपद्धती, नागरिकांशी सातत्यपूर्ण संपर्क आणि वेळेचे प्रभावी व्यवस्थापन यांच्या बळावर शंभर टक्के उद्दिष्ट साध्य करता येते, असेही यावेळी नमूद करण्यात आले.या प्रसंगी एसआयआर मोहिमेत कार्यरत अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेला अधिक गती द्या - जिल्हाधिकारी

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

### विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेचा आढावा



विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेची प्रभावी अंमलबजावणी, मतदार यादीतील माहितीची अचूकता, गणना प्रपत्रांचे वेळेत वितरण, संकलन, डिजिटायझेशनसाठी सर्व संबंधितांनी परस्पर समन्वयाने नियोजनबद्ध पद्धतीने काम करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी योगेश कुंभेजकर यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित 'विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण' आढावा बैठकीत ते बोलत होते. मोहिमेला अधिक गती देत सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वयाने आणि सूक्ष्म नियोजन करून काम करावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. यावेळी उपजिल्हा निवडणूक अधिकारी विरेंद्र जाधव, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, नगरपालिका प्रशासनाचे सहायक आयुक्त परदेशी तसेच जिल्ह्यातील सर्व मतदार नोंदणी अधिकारी (ERO), सहायक मतदार नोंदणी अधिकारी (AERO), पर्यवेक्षक आणि मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) दूरदृश्यप्रणालीद्वारे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) या बैठकीला जोडले गेले होते. बैठकीत विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या सद्यस्थितीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेअंतर्गत १७ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंत जिल्ह्यातील एकूण १०,१९,५१९ मतदारांपैकी ८,९९,२८० गणना प्रपत्रांचे वितरण पूर्ण झाले असून हे प्रमाण ८८.२१ टक्के आहे.

## नवीन न.प. कॉम्प्लेक्सचा जिना जिर्ण, लवकरच काम करणार पूर्ण - नगराध्यक्ष अनिल केंदळे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●





पाटणी चौक रविवार बाजार मच्छमार्केट समोरील नवीन नगर परिषद कॉम्प्लेक्सचा जिणा जिर्ण झाला आहे. या जिण्याचा काही भाग कोसळला अन् काही भाग कोसळने सुरू आहे. त्यामुळे काही अनर्थ घडण्याअगोदरच नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी या जिण्याची पाहणी करून लवकरच काम पुर्ण करण्याचे आश्वासन दिले.

यावेळी त्यांनी नगर पालिक बांधकाम अभियंता निखिल चव्हाण यांना बोलावून सविस्तर माहिती घेवून बांधकाम करण्याचे आदेशही दिले.नवीन नगर परिषद कॉम्प्लेक्स जिणा जिर्ण झाला असून या संबंधी या व्यापारी संकुलातील व्यापाऱ्यांनी नगराध्यक्षाकडे या संबंधी तक्रारी करून दुरूस्ती करण्याची विनंती केली. व्यापाऱ्याच्या विनंतीवरून नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी तत्काळ दखल घेत जिर्ण जिण्याची पाहणी करून तत्काळ दुरूस्तीचे न.प.अभियंता चव्हाण यांना आदेश दिले. यावेळी नगरसेवक पुरणचंद बदलाणी, शेख नुरभाई, सामाजिक कार्यकर्ते व युवा नेते अमोल इंगोले, सामाजिक कार्यकर्ते व युवा नेते मंगेश भालेराव, रेल्वे समितीचे सदस्य गुलाठी, आर्कीटेक महाविर बडजात्या, मनोज बकाल, जोतीष्यचार्य डॉ. भरत चंदणानी, गणेश शेळके टेलर, राजुभाऊ जाधव, हे उपस्थित होते.

## जागतिक न्याय दिनानिमित्त विधी क्षेत्रातील मान्यवरांचा न्याय, समता व कायदेविषयक जनजागृतीवर भर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



: जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम आणि जिल्हा विधिज्ञ मंडळ, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक न्याय दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन १७ जुलै रोजी जिल्हा व सत्र न्यायालयातील कक्ष क्रमांक १३ येथे करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश अनिल सुब्रमण्यम होते. यावेळी ज्येष्ठ विधिज्ञ जी. व्ही. मोरे यांनी जागतिक न्याय दिनाचे महत्त्व, न्यायव्यवस्थेची भूमिका आणि कायद्याच्या राज्याची संकल्पना याविषयी मार्गदर्शन केले.कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश-१ जे. पी. झपाटे, जिल्हा न्यायाधीश-२ तथा अतिरिक्त सत्र न्यायाधीश व्ही. डी. इंगळे, जिल्हा विधिज्ञ मंडळाचे अध्यक्ष ए. एस. बाकलीवाल, जिल्हा सरकारी अभियोक्ता ए. आर. व्यवहारे, तसेच मुख्यालयातील सर्व न्यायिक अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा वकील संघाचे सचिव डी. डी. गुडदे यांनी केले. जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष वैभव तिफणे यांनी आभार मानले.

# मलकापूर हादरले : चाकू-विळ्याचा धाक दाखवत विवाहितेवर अत्याचार

प्रतिनिधी १९ जुलै





**मलकापूर :** तालुक्यातील दुधलगाव परिसरात अत्यंत संतापजनक घटना घडली असून, दोन अज्ञात आरोपींनी एका दाम्पत्याच्या घरात घुसून चाकू व विळ्याचा धाक दाखवत लुटमार केली. त्यानंतर पतीला जीवे मारण्याची धमकी देत विवाहितेला शेतात नेऊन दोघांनी आळीपाळीने बलात्कार केल्याची धक्कादायक घटना १७ जुलै रोजी रात्री घडली. या प्रकरणी मलकापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पीडिता ही आपल्या पतीसोबत दुधलगाव येथील शेतातील घरात झोपलेली असताना रात्री ११ च्या सुमारास दोन अज्ञात इसमांनी घराचा दरवाजा तोडून प्रवेश केला. आरोपींपैकी एकाच्या हातात चाकू तर दुसऱ्याच्या हातात विळा होता. दोघांनी दाम्पत्याला शस्त्रांचा धाक दाखवत पतीजवळील रेडमी 5G कंपनीचा मोबाईल आणि रोख 600 रुपये जबरदस्तीने हिसकावून घेतले. यानंतर आरोपींनी सोन्या-चांदीचे दागिने मागितले. दागिने नसल्याचे सांगितल्यावर त्यांनी दाम्पत्याला जबरदस्तीने जवळील शेतात नेले. तेथे पतीला विळ्याचा धाक दाखवून आरोपींनी विवाहितेवर आळीपाळीने बळजबरीने बलात्कार केला. घटना घडल्यानंतर आरोपी मोटारसायकलवरून पसार झाले.

या प्रकरणी पीडित महिलेच्या तक्रारीवरून मलकापूर ग्रामीण पोलिसांनी अज्ञात दोन आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (BNS) मधील बलात्कार, सामूहिक बलात्कार, दरोडा, घरफोडी, धमकी व इतर गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे.घटनास्थळी जिल्हा पोलीस अधीक्षक तांबे, सहाय्यक पोलीस अधीक्षक जगताप, फिंगरप्रिंट तज्ञ, श्वान पथक दाखल झाले. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक सतीश महल्ले करीत आहेत.

# सोनम वांगचूक यांच्या मागण्यांसाठी मलकापुरात भव्य मोर्चा

## केंद्र सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी

प्रतिनिधी १९ जुलै



**मलकापूर :** लडाखचे ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचूक यांच्या देशहिताच्या प्रमुख मागण्यांसाठी आज 'सोनम वांगचूक सपोर्ट समिती, मलकापूर' च्या वतीने शहरात एक भव्य निषेध मोर्चा काढण्यात आला. दुपारी ११ वाजता स्थानिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यास अभिवादन करून सुरू झालेला हा मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला.

या मोर्चात मलकापूर शहरातील विविध समाजसेवा संघटना, राजकीय पुढारी, डॉक्टर, वकील, पत्रकार आणि मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. आंदोलनादरम्यान "केंद्र सरकार मुर्दाबाद", "भाजपा मुर्दाबाद", "भारत माता की जय", "संविधान अमर रहे" आणि "या सरकारचं करायचं काय, खाली डोकं वर पाय" अशा जोरदार घोषणा देत आंदोलकांनी परिसर दणाणून सोडला व केंद्र सरकारच्या धोरणांचा तीव्र निषेध केला.

मुख्य मागण्या आणि निवेदन:

मोर्च्याच्या सांगतेनंतर उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत भारताच्या माननीय राष्ट्रपतींना एक निवेदन सादर करण्यात आले. या निवेदनात प्रामुख्याने दोन महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या आहेत:

१) केंद्रीय शिक्षणमंत्र्यांचा राजीनामा: NEET सारख्या उच्च शिक्षण क्षेत्रातील प्रवेशासाठीच्या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेत झालेल्या पेपरफुटी प्रकरणाची नैतिक, प्रशासकीय व राजनैतिक जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी त्वरित राजीनामा द्यावा.

२) लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा: सोनम वांगचूक यांच्या प्रदीर्घ आंदोलनाची दखल घेऊन लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्यात यावा आणि घटनेच्या सहाव्या परिशिष्टात (Sixth Schedule) त्याचा समावेश करावा. निवेदनात पुढे इशारा देण्यात आला आहे की, केंद्र सरकारने या लोकशाही मार्गाने केलेल्या मागण्यांची त्वरित दखल न घेतल्यास, १५ ऑगस्टपासून देशभर तीव्र आंदोलन व उपोषण छेडण्यात येईल. यावेळी ॲड साहेबराव मोरे, डॉ.अरविंद कोलते, ॲड हरीश हरीश रावळ, गजानन ठोसर, मंगलाताई पाटील,हाजी रशिदखा जमादार, ॲड जि.डी पाटील,संभाजी शिर्के,अशोक सुरडकर वकील संघटना आणि पत्रकार हरी गोसावी ,हनुमान जगताप, प्रवीण राजपूत,अजय टप, अनिल गोठी कैलास काळे, करण झनके इत्यादी उपस्थित होते

# खामगावात 17 'बीएलओं'नी गाठले 'एसआयआर'चे 100 टक्के उद्दिष्ट !

प्रतिनिधी १९ जुलै

## ७० टक्के डिजिटायझेशनसह मोहिमेला वेग

**खामगाव:** निवडणूक विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या एसआयआर मोहिमेला विधानसभा खामगाव मतदारसंघात चांगली गती मिळत असून, कामाचा वेग लक्षणीयरीत्या वाढला आहे. आतापर्यंत १७ बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील १०० टक्के काम पूर्ण केल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली आहे. याशिवाय, अनेक बीएलओंनी ८० ते ९० टक्क्यांपर्यंत प्रगती साधली असून, संपूर्ण मतदारसंघात सुमारे ७० टक्के डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. एसआयआर मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचे काम सध्या सुरू असून, मतदारांकडून गणना अर्ज भरून घेतले जात आहेत. हे अर्ज ऑनलाइन पद्धतीने नोंदविले जात असल्याने प्रक्रियेला अधिक पारदर्शकता आणि वेग प्राप्त होत आहे.

खामगाव विधानसभा मतदारसंघात एकूण ३२२ बीएलओ कार्यरत असून, सर्व कर्मचारी जलदगतीने काम करीत आहेत. या मोहिमेत खामगाव मतदारसंघाने जिल्ह्यात आघाडी घेतल्याचे चित्र दिसून येत आहे.

१५ निवडणूक विभागाकडून १७जुलैपर्यंतच्या आढाव्यानुसार, बीएलओंनी पूर्ण उद्दिष्ट गाठले असून, उर्वरित बीएलओदेखील लवकरच १०० टक्के काम पूर्ण करतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. मतदार यादी अद्ययावत व अचूक करण्यासाठी ही मोहीम महत्त्वाची मानली जात असून, प्रशासनाने नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

### २९ जुलैपर्यंत चालणार एसआयआर मोहीम

एसआयआर मोहिमेअंतर्गत मतदारांना गणना अर्ज वितरित करून ते भरून घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. भरलेले अर्ज ऑनलाइन पद्धतीने नोंदविले जात असून संपूर्ण कामकाजाला वेग देण्यात येत आहे. ३० जूनपासून सुरू झालेली ही मोहीम २९ जुलैपर्यंत चालणार असल्याची माहिती निवडणूक विभागाकडून देण्यात आली आहे.

### उद्दिष्ट गाठणाऱ्या बीएलओंचा गौरव !

मोहिमेअंतर्गत कमी कालावधीत १०० टक्के उद्दिष्ट गाठणाऱ्या बीएलओ यांचा निवडणूक विभागाकडून सत्कार करण्यात येत आहे. मोहिमेतील उल्लेखनीय कामगिरीबद्दल या कर्मचाऱ्यांचे कौतुक व्यक्त केले जात आहे. तीन दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी डॉ. प्रवीण देवरे आढावा बैठकीसाठीआलेअसता,त्यांच्याहस्तेसत्कार करूनप्रशस्तीपत्रप्रदानकरण्यातआले.

# शेतजमीन नावावर करण्याच्या वादातून काकाला मारहाण

## कोकलवाडी येथील घटना : पुतण्याविरुद्ध गुन्हा दाखल

प्रतिनिधी १९ जुलै

**नांदुरा:** तालुक्यातील कोकलवाडी येथे शेती स्वतःच्या नावावर करून देण्याच्या कारणावरून काका-पुतण्यात झालेल्या वादाचे पर्यवसान मारहाणीत झाले. याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी पुतण्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

गुलाबसिंग मोहनसिंग राजपूत (वय ६८, रा. कोकलवाडी) यांच्या तक्रारीवरून त्यांचा पुतण्या रणजितसिंग धीरजसिंग राजपूत (वय २५, रा. कोकलवाडी) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ११८(१), ३५२, ३५१ (२) व ३५१ (३) नसार गन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादींच्या नावावरील शेती आरोपीच्या नावावर करून देण्याच्या कारणावरून दोघांमध्ये वाद झाला.

वादाचे रूपांतर हाणामारीत होऊन आरोपीने शिवीगाळ करत लाकडी काठीने फिर्यादीस मारहाण केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या घटनेत फिर्यादी जखमी झाले असून, त्यांच्या पत्नीने मध्यस्थी करत वाद शांत केला. पुढील तपास नांदुरा पोलिस करीत आहेत.

# अन्न व औषध प्रशासनाची नांदुरा, खामगावात छापेमारी, नमुने जप्त!

## पाच प्रतिष्ठानांमध्ये परवाना व नोंदणीतील गंभीर त्रुटी उघड : खाद्य भेसळखोरांचे धाबे दणाणले!

प्रतिनिधी १९ जुलै

**खामगाव:** राज्यात अन्न भेसळीविरोधात आक्रमक भूमिका घेतलेल्या अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या निर्देशानुसार बुलढाणा जिल्ह्यात शुक्रवारी सायंकाळी धडक कारवाई करण्यात आली. खामगाव व नांदुरा येथील पाच मिठाई व्यावसायिकांवर टाकण्यात आलेल्या छाप्यामुळे खाद्य भेसळ करणाऱ्या व्यावसायिकांचे अक्षरशः धाबे दणाणले. कारवाईची चाहूल लागताच खामगावातील काही व्यावसायिकांनी दुकाने बंद करून पळ काढल्याची चर्चा रंगली.

सहायक आयुक्त प्रमोद पाटील, अन्न सुरक्षा अधिकारी गजानन वसावे यांच्यासह अमरावती विभागातील पाच अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांच्या पथकाने ही संयुक्त कारवाई केली. तपासणीदरम्यान विविध मिठाईचे नमुने संकलित करून प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आले. पुढील काळातही अशाच प्रकारच्या मोहिमा सुरू राहणार असल्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

व्यावसायिकांना इशारा

अन्न भेसळ, परवान्यांतील अनियमितता आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात प्रशासनाने आता कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे. त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या व्यावसायिकांना मोठा इशारा मिळाला असून, आगामी काळात अशा कारवाया अधिक तीव्र होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्याचवेळी खामगावमध्ये जसवंत कॉलनीतील भवानी बिकानेर फूड प्रॉडक्ट येथून खवा व मलाई पेढ्याचे नमुने घेण्यात आले. तसेच खिलोशिया भुवन आणि भगवानजी गोविंदजी या प्रतिष्ठानांवरूनही मलाई पेढ्याचे नमुने संकलित करण्यात आले. या धडक मोहिमेमुळे जिल्ह्यातील मिठाई व दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली.

### पेढ्याचे नमुने संकलीत

नांदुरा येथील जगदंबा बिकानेर स्वीट मार्ट आणि नवदुर्गा स्वीट मार्ट येथे धाड टाकून मलाई पेढ्याचे नमुने घेण्यात आले. तपासणीत जगदंबा बिकानेर स्वीट मार्टचे गोदाम विनापरवाना सुरू असल्याचे निदर्शनास आले. तर नवदुर्गा स्वीट मार्टच्या गोदामाची आवश्यक नोंदणीच नसल्याचे उघडकीस आले. या त्रुटींबाबत संबंधितांवर नियमानुसार पुढील कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# एकलारा फाट्यावर हॉटेलच्या जागेवरून दोन गटांत वाद

## दोन्ही गटांविरुद्ध परस्परविरोधी गुन्हे दाखल

प्रतिनिधी १९ जुलै

**संग्रामपूर:** तालुक्यातील एकलारा (बानोदा) फाटा येथे हॉटेलच्या जागेच्या ताब्यावरून शनिवारी (दि. १८) सकाळी दोन गटांमध्ये वाद झाला. या प्रकरणी दोन्ही बाजूंच्या तक्रारींवरून तामगाव पोलिस ठाण्यात परस्परविरोधी गुन्हा दाखल करण्यातआलेआहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वरवट बकाल येथील ज्येष्ठ पत्रकार भाऊ भोजने यांनी दिलेल्या फिर्यादीत,एकलारा फाटा येथील त्यांच्या मालकीच्या जागेवरीलहॉटेलमध्येसहाजणांनी प्रवेश करून टीनपत्रे, अँगल व टिनशेडचीतोडफोडकरतसुमारेएक लाख रुपयांचे नुकसान केल्याचा आरोप केला आहे. तसेच विरोध केल्यावर शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी भीमराव लोखंडे, कुणाल लोखंडे, गजानन कोसे व अन्य तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान,पुष्पाभिमरावलोखंडेयांनी दिलेल्या तक्रारीवरून भाऊ भोजने वडाबेरावयांच्याविरुद्धशिवीगाळव धमकी दिल्याप्रकरणी स्वतंत्र गुन्हा नोंदविण्यातआलाआहे.

# मतदार पडताळणी अभियानात नागरिकांच्या सहकार्याचे आवाहन

प्रतिनिधी १९ जुलै

## हेल्पलाईन १९५० सुरू

**बुलढाणा :** भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये व ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमाच्या तिसऱ्या टप्प्यात बुलढाणा जिल्ह्याचा समावेश केला आहे. या अभियानाअंतर्गत जिल्ह्यातील सर्व मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी करण्यात येत असून, मतदारांना आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालयामार्फत हेल्पलाईन क्रमांक १९५० सुरू करण्यात आला आहे.

विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) घराघरांत जाऊन अंशतः भरलेले गणना पत्र (Enumeration Form) वितरित करीत असून, नागरिकांकडून ते भरून घेऊन जमा करत आहेत. या प्रक्रियेद्वारे मतदार यादीतील नोंदी अचूक व अद्ययावत करण्यात येणार आहेत.

मतदार यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी संबंधित व्यक्ती भारतीय नागरिक असणे तसेच १८ वर्ष पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. या प्रक्रियेदरम्यान मतदारांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच विधानसभा मतदारसंघ स्तरावर मतदार सहाय्य केंद्र (Voter Help Desk) कार्यान्वित करण्यात आले आहे. भारत निवडणूक आयोगाने तक्रार निवारणासाठी एनजीएसपी (National Grievance Service Portal) तसेच Book a Call with BLO ही सुविधा उपलब्ध करून दिली असून, मतदारांनी या सुविधांचा आवश्यकतेनुसार लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पेढ्याचे नमुने संकलीत

नांदुरा येथील जगदंबा बिकानेर स्वीट मार्ट आणि विधानसभा मतदार संघनिहाय संपर्क क्रमांक..

मलकापूर (९०४९८४७१४९), बुलढाणा (८७८८६४६११८), चिखली (९१५६९९०८४४), सिंदखेड राजा (७०२८५७३६८१), मेहकर (अ.जा.) (०७२६८-२२४५२४), खामगाव (७२६३२५२१३७), जळगाव जामोद (०७२६६-२२४४२५) तसेच जिल्हास्तरीय हेल्पलाईन १९५० सुरु करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, बीएलओ घरोघरी भेट देत असताना त्यांना स्वतःची व कुटुंबातील सदस्यांची अचूक माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे, जेणेकरून मतदार यादी अधिक अचूक व त्रुटीमुक्त तयार होण्यास मदत होईल.

# मलकापूर, बावनबीर येथे 'म्युल बँक खाते' प्रकरण उघड; ऑनलाईन फसवणुकीचा गुन्हा दाखल

प्रतिनिधी १९ जुलै

## तांत्रिक विश्लेषणातून संशयास्पद व्यवहारांचा शोध

**मलकापूर:** आनलाईन गुंतवणुकीचे आमिष, पार्टटाईम नोकरी, 'डिजिटल अरेस्ट' सह विविध माध्यमांतून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या सायबर गुन्हेगारांकडून वापरल्या जाणाऱ्या 'म्युल बँक खाते' रॅकेटचा मलकापूर शहर व सोनाळा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे.

राष्ट्रीय सायबर गुन्हे नोंदणी पोर्टल आणि 'समन्वय' पोर्टलवरील माहितीच्या तांत्रिक विश्लेषणातून मलकापूर येथील सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या एका खात्यात सायबर फसवणुकीतील दीड लाख रुपये, तर बावनबीर येथील बँक ऑफ महाराष्ट्र शाखेतील एका खात्यात ५८ हजार २५० रुपये जमा झाल्याचे उघड झाले. या दोन्ही प्रकरणांमध्ये अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देशभरातील सायबर फसवणुकीच्या तक्रारींचे विश्लेषण करताना मलकापूर आणि या बावनबीर येथील खात्यांमध्ये संशयास्पद आर्थिक व्यवहार आढळून आले. प्राथमिक तपासात ही खाती सायबर गुन्हेगारांकडून 'म्युल बँक खाते' म्हणून वापरण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून, या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

### अवघ्या दोन मिनिटांत दीड लाखांची रक्कम जमा

मलकापूर येथील प्रकरणाच्या तपासात २० एप्रिल २०२६ रोजी संबंधित खात्यात अवघ्या दोन मिनिटांच्या अंतराने दोन व्यवहार झाल्याचे स्पष्ट झाले. दुपारी ४:२३ वाजता एक लाख रुपये, तर ४:२५ वाजता ५० हजार रुपये, अशी एकूण दीड लाख रुपयांची रक्कम खात्यात जमा करण्यात आली होती.

### अहिल्यानगरमधील नागरिकाची फसवणूक

मलकापूर येथील प्रकरणातील रक्कम अहिल्यानगर जिल्ह्यातील कोतवाली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका नागरिकाची ऑनलाइन आर्थिक फसवणूक करून मिळविण्यात आली होती. तसेच बावनबीर येथील एका व्यक्तीच्या खात्यात रक्कम जमा करुन वेगवेगळ्या खात्यात हस्तांतरीत केली.

### खातेदाराचा शोध सुरू!

मलकापूर येथील प्रकरणाच्या तपासात २० एप्रिल २०२६ रोजी संबंधित खात्यात अवघ्या दोन मिनिटांच्या अंतराने दोन व्यवहार झाल्याचे स्पष्ट झाले. दुपारी ४:२३ वाजता एक लाख रुपये, तर ४:२५ वाजता ५० हजार रुपये, अशी एकूण दीड लाख रुपयांची रक्कम खात्यात जमा करण्यात आली होती.

### काय आहे 'म्युल बँक खाते' फसवणूक प्रकार ?

सायबर गुन्हेगार फसवणुकीतून मिळालेली रक्कम थेट स्वतःच्या खात्यात जमा न करता इतर व्यक्तींच्या किंवा बनावट कागदपत्रांवर उघडलेल्या खात्यांचा वापर करतात. अशा खात्यांना 'म्युल बँक खाते' म्हटले जाते. या खात्यांमधून रक्कम पुढे इतर खात्यांमध्ये वळवून किंवा एटीएम, चेक आदींच्या माध्यमातून काढून घेतली जाते. त्यामुळे मूळ आरोपींपर्यंत पोहोचणे कठीण होते.

## 'सिटी न्यूज सुपरफास्ट'च्या दणक्यानंतर गुन्हे दाखल

# शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचे काय ?

### बोगस बियाणे कंपन्यांचा माज उतरवला ! 9 बड्या कंपन्यांवर एफ आय आर

प्रतिनिधी १९ जुलै

अकोला: राज्यात 'शासन आपल्या दारी'च्या गप्पा मारल्या जात असताना बोगस कंपन्या थेट शेतकऱ्यांच्या घरात घुसून दरोडा टाकत असल्याचा पर्दाफाश 'सिटी न्यूज सुपरफास्ट' ने १४ आणि १५ जुलैच्या अंकात अत्यंत आक्रमकपणे केला होता. जिल्ह्यात बोगस बियाण्यांच्या तब्बल १,७२२ तक्रारी प्राप्त होऊन आणि १८३ सॅम्पल्स अप्रमाणित (फेल) आढळल्यानंतरही कृषी विभाग केवळ कागदी घोडे नाचवत होता. पंचनामा न करता केवळ २ कंपन्यांवर थातूरमातूर कारवाई करून इतर बड्या बियाणे कंपन्यांना अभय देणाऱ्या आणि सॅम्पलचे रिपोर्ट दाबून ठेवणाऱ्या कृषी आयुक्तालयाच्या संशयास्पद भूमिकेवर आम्ही थेट प्रहार केला होता.

बियाण्यांच्या ९ कंपन्यांवर गुन्हे दाखल करून प्रशासनाने आपली पाठ थोपटून घेतली असली, तरी 'सिटी न्यूज सुपरफास्ट'ची लढाई इथेच संपत नाही. ज्या हजारो शेतकऱ्यांवर बोगस बियाण्यांमुळे दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे, त्यांचे झालेले अतोनात नुकसान या बोगस कंपन्यांच्या मालकांकडून वसूल करून शेतकऱ्यांच्या पदरात कधी टाकणार ? तसेच, 'मे महिन्यात सोयाबीनचे सॅम्पल घेऊ नका' असा अजब अलिखित नियम बनवून कंपन्यांना मोकळे रान देणाऱ्या कृषी आयुक्तालयातील त्या 'महाभागांची' उच्चस्तरीय चौकशी होणार की नाही ? अशी विचारणा होत आहे. सिटी न्यूज च्या या दणक्यामुळे प्रशासकीय वर्तुळात एकच खळबळ माजली. अखेर १८ जुलै २०२६ रोजी अकोला जिल्हा प्रशासन आणि कृषी विभागाने एकत्र येत जिल्ह्यात धुमाकूळ घालणाऱ्या ९ मोठ्या सोयाबीन बियाणे कंपन्यांविरुद्ध थेट फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांची मस्ती जिरवली आहे.


सिटी न्यूज सुपरफास्ट
देवाभाऊंच्या सरकारचे अपयश !
1 शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसणे सुरू; कृषी अधिकारी झोपले होते काय?
2 पंचनामा न करता दोन बियाणे कंपन्यांवर गुन्हे दाखल, इतरांचे काय?
3 कृषी विभागाचे केवळ कागद काळे करणे सुरू, उपाययोजना शून्य !
सोयाबीन सॅम्पलचे रिपोर्ट लपवून मोठा घोळ !
सिटी न्यूज सुपरफास्ट
अकोला जिल्ह्यात बोगस बियाणे कंपन्यांचा हैदोस
कृषी आयुक्तालयाच्या भूमिकेवर संशयाची सुई
बियाणे सॅम्पलचे अहवाल उशिराने का, उच्चस्तरीय चौकशीची मागणी !

### या ९ बोगस कंपन्यांवर कारवाई

» अकोला जिल्ह्यातील सर्व गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनी (कृषी विभाग, महाराष्ट्र शासन व जिल्हा परिषद) विविध पोलीस ठाण्यांमध्ये खालील कंपन्यांविरुद्ध अत्यावश्यक वस्तू अधिनियम अन्वये गुन्हे दाखल केले आहेत. ओसवाल सीड्स, विगर सीड्स, इगल सीड्स, इंनोवेज (पार्शव जेनेटिक) सीड्स, ग्रीन गोल्ड सीड्स, दफ्तरी सीड्स, अंकुर सीड्स, बाफना सीड्स, ॲशुअर सीड्स यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.ही धडक कारवाई सुनील बोरकर (संचालक, निविष्ठा व गुण नियंत्रण), प्रवीण देशमुख (मुख्य गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक, कृषी आयुक्तालय पुणे) यांच्या आदेशान्वये आणि गणेश घोरपडे (विभागीय कृषी सहसंचालक, अमरावती) यांच्या सूचनेनुसार करण्यात आली. या मोहिमेला वर्षा मीना (जिल्हाधिकारी, अकोला) व अर्पित चांडक (पोलीस निरीक्षक, अकोला) यांचे सक्रिय सहकार्य लाभले.तसेच, मैदानावर उतरून जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे, कृषी उपसंचालक श्री. हरीश देशमुख, कृषी विकास अधिकारी डॉ. तुषार जाधव, तंत्र अधिकारी नितीन लोखंडे, मोहीम अधिकारी सालके आणि जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक दांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा दणका देण्यात आला.



# श्री जय जगन्नाथच्या जयकारांनी दुमदुमली श्री राजराजेश्वर नगरी

### ओडिशातील श्री जगन्नाथ धामनंतर अकोल्यात प्रथमच भव्य श्री जगन्नाथ रथयात्रा

प्रतिनिधी १९ जुलै

**अकोला :** शहरातील सरकारी बगीचा येथील इस्कॉन परिवार, अकोला यांच्या वतीने रविवारी प्रथमच भगवान श्री जगन्नाथ, बलभद्र व सुभद्रा महाराणी यांच्या मनोहारी मूर्तींसह भव्य श्री जगन्नाथ रथयात्रेचे आयोजन करण्यात आले. यावेळी "जय जगन्नाथ"च्या अखंड जयघोषाने राजराजेश्वर नगरी भक्तिमय वातावरणात दुमदुमून गेली.

रविवारी सकाळी ११ वाजता भगवान श्री जगन्नाथ यांची विधिवत पूजा-अर्चना व महाआरती करण्यात आली. त्यानंतर भजन, कीर्तन च्या तालावर नृत्य करत रथयात्रेला इस्कॉन मंदिरातून निघालेली. ही रथयात्रा राधे नगर, जिल्हा परिषद, जिल्हाधिकारी कार्यालय, जीएमसी रुग्णालय, अशोक वाटिका, धिंग्रा चौक, गांधी रोड, सिटी कोतवाली, खोलेश्वर मार्गे पुन्हा इस्कॉन मंदिरात परतली.

रथयात्रेच्या मार्गावर विविध ठिकाणी भाविकांनी आकर्षक रांगोळ्या काढून, पुष्पवृष्टी करून तसेच शीतपेय वाटप करून रथयात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले. मंदिरात रथ दर्शनासाठी ठेवण्यात आल्यानंतर रात्री उशिरापर्यंत शहरातील विविध भागांतून आलेल्या भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. समारोपप्रसंगी सहभागी भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. शेकडो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.





### स्वच्छतेचा आदर्श

» रथयात्रेदरम्यान इस्कॉन परिवाराने स्वच्छतेवर विशेष भर दिला. रथाच्या पुढे महिला व पुरुष स्वयंसेवकांनी झाडू मारून संपूर्ण मार्ग स्वच्छ ठेवला. या उपक्रमाचे नागरिकांनी विशेष कौतुक केले. या प्रसंगी विदर्भ झोनल सुपरवायझर अनंतशेष प्रभूजी, इस्कॉन अमरावतीचे अध्यक्ष अद्वैताचार्य प्रभूजी तसेच इस्कॉन अकोल्याचे अध्यक्ष वेदविभूषण प्रभूजी यांची प्रमुख उपस्थिती होती.

### मान्यवरांकडून श्री जगन्नाथ रथयात्रेचे जल्लोषात स्वागत

» ओडिशातील श्री जगन्नाथ धामनंतर राजराजेश्वर नगरीत प्रथमच निघालेल्या भव्य श्री जगन्नाथ रथयात्रेचे शहरातील धार्मिक, सामाजिक, राजकीय व आध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांनी उत्स्फूर्त स्वागत केले. यावेळी आ. वसंत खंडेलवाल, महापौर शारदा खेडकर, उपमहापौर अमोल घोंगे, नगरसेवक हरीश आदिमचंदानी, नगरसेवक सागर भारुका, महिला भजनी मंडळ, संत गजानन महाराज वारकरी परिवार, राधा सत्संग मंडळ, खोलेश्वर शिवभक्त मंडळ तसेच गांधी चौक मित्र मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी रथयात्रेचे पूजन करून श्री जगन्नाथांचे दर्शन घेतले व यात्रेला शुभेच्छा दिल्या.

# निंभोरा बु. येथे विजेचा शॉक लागून युवकाचा मृत्यू

### नातेवाईकांची कंपनीवर गुन्हा दाखल करण्याची मागणी

प्रतिनिधी १९ जुलै

**तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यातील निंभोरा बु. येथे गावठाण सेपरेशन फिडरच्या कामादरम्यान विजेचा शॉक लागून शेख समीर शेख जमीर वय 38, रा. तळेगाव यांच्या मृत्यूनंतर घटनास्थळी तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. मिळालेल्या माहितीनुसार, अशोका बीड कॉन कंपनी मार्फत गावठाण सेपरेशन फिडरचे काम सुरू होते. कामादरम्यान दुसऱ्या लाईनचा विद्युत प्रवाह खांबात आल्याने शेख समीर यांना जोरदार शॉक बसला आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच तेल्हारा पोलीस



घटनास्थळी दाखल झाले असून पंचनामाची प्रक्रिया सुरू आहे. दरम्यान, मृताच्या नातेवाईकांनी घटनास्थळी मोठी गर्दी केली असून संबंधित कंपनी व दोषींवर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

"जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही, तोपर्यंत मृतदेह घटनास्थळावरून उचलू देणार नाही," अशी ठाम भूमिका नातेवाईकांनी घेतली आहे. घटनास्थळी पोलीस बंदोबस्त वाढविण्यात आला असून परिस्थिती नियंत्रणात ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

या प्रकरणाचा तपास तेल्हारा पोलीस करीत आहेत.

# वेश्या व्यवसाय विरोधातील मोठी कारवाई : संघटित रॅकेटचा पर्दाफाश

### आरोपींनी ग्राहकांचे व्हिडिओ काढल्याचाही दावा

प्रतिनिधी १९ जुलै

**अमरावती :** राजापेठ पोलीस स्टेशन, अमरावती शहर यांनी अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम, 1956 अंतर्गत वेश्याव्यवसायाविरोधात कारवाई करून संघटित रॅकेटचा पर्दाफाश केला आहे.

प्राप्त झालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे वरिष्ठ अधिकारी व सहाय्यक पोलीस आयुक्त यांच्या लेखी परवानगीनंतर पंच, बनावट ग्राहक व पोलीस पथकाच्या मदतीने सामरा नगर येथील कृष्ण मंदिराजवळ असलेल्या साईदर्शन रेसिडेन्सी, फ्लॅट क्र. 402 येथे नियोजनबद्ध सापळा कारवाई करण्यात आली. या कारवाईत आरोपी मंगला विनोद पळसपगार व सुशांत अरविंद पळसपगार यांना अटक करण्यात आली असून तीन महिलांची सुटका करण्यात आली. याप्रकरणी राजापेठ पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. 564/2026 अन्वये अनैतिक मानवी वाहतूक (प्रतिबंध) अधिनियम, 1956 चे कलम 3, 4, 5 तसेच भारतीय न्याय संहिता कलम 3(5) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रोशन चटे करीत आहेत. तपासाआरोपी मंगला विनोद पळसपगार हिने पोलीस कोठडीत दिलेल्या माहितीनुसार, तिचा पती विनोद पळसपगार (सध्या फरार) हा मध्य प्रदेश व पश्चिम बंगाल येथील एजंटांमार्फत महिलांना अमरावती येथे बोलावत असे. त्यानंतर शहरातील विविध उच्चभ्रू परिसरात 2 BHK फ्लॅट भाड्याने घेऊन तेथे वेश्याव्यवसाय चालविण्यात येत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. तपासात असेही निष्पन्न झाले की, मंगला पळसपगार हिने यापूर्वी साईनगर, देशमुख ले-आऊट, गोंडबाबा मंदिर परिसर तसेच सध्या सामरा नगर येथे हा व्यवसाय चालविला.

तिचा सख्खा भाऊ हा मंगलधाम परिसरात स्वतंत्रपणे अशाच प्रकारचा व्यवसाय करीत असल्याची माहिती मिळाली असून त्याबाबत पुढील तपास सुरू आहे. प्राथमिक तपासात WhatsApp Business अकाउंटद्वारे ग्राहकांशी संपर्क साधून महिलांचे फोटो पाठविणे, प्रति महिला सुमारे ₹2,500 प्रमाणे व्यवहार निश्चित करणे, तसेच आरोपींच्या मोबाईलमधून मोठ्या प्रमाणात महिलांची छायाचित्रे आढळून आली आहेत. आरोपी विनोद पळसपगार हा स्वतःच्या राहत्या घरी व्हीआयपी ग्राहकांसाठी स्वतंत्र खोली उपलब्ध करून देत असल्याचेही तपासात समोर आले आहे. आरोपींकडून मिळालेल्या माहितीनुसार, आतापर्यंत बऱ्याच महिलांना या व्यवसायात गुंतविण्यात आल्याची माहिती समोर आली असून तिची पडताळणी सुरू आहे.तसेच शहरात अशा प्रकारची आणखी काही रॅकेट कार्यरत असल्याची माहिती मिळाली असून त्याबाबत सखोल तपास सुरू आहे. आरोपींच्या मोबाईलमधील WhatsApp चॅट, संपर्क यादी, PhonePe व इतर आर्थिक व्यवहार तसेच डिजिटल पुराव्यांचे विश्लेषण करण्यात येत आहे. या तपासातून काही उच्चभ्रू व्यक्ती तसेच शासकीय व निमशासकीय कर्मचारी बळी पडल्याचे दिसून येत आहे काही ग्राहकांचे व्हिडिओ चित्रीकरण करून त्यांचा गैरफायदा घेतल्याची बाबही प्राथमिक तपासात समोर आली असून त्याबाबत तसेच या रॅकेटशी संबंधित इतर व्यक्तींच्या सहभागाबाबत अधिक तपास सुरु आहे.



### कार्यवाही अधिकारी

» सदर कारवाई राकेश ओला, पोलीस आयुक्त,. श्याम घुगे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ-2, तसेच. संजय खताळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली, डीबी पथकाचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन शिंदे तसेच तपास अधिकारी पोलीस उपनिरीक्षक रोशन चटे व त्यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

# शेतकरी एल्गार समिती बार्शीटाकळीच्या कार्यकर्त्यांचे बेमुदत उपोषण



प्रतिनिधी १९ जुलै

बार्शीटाकळी. खरीप हंगामात बऱ्याच कंपन्याच्या बोगस बियाण्यामुळे आर्थिक संकटात सापडलेल्या शेतक-यांना दुबार पेरणीचा सामना करावा लागला आहे. त्यामुळे बार्शीटाकळी तालुक्यात शेतकरी आत्महत्या वाढण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे. प्रशासनला निवेदन देऊनही कार्यवाही होत नाही. सरकार निवेदनाची दाखल घेत नसल्यामुळे शेतकरी एल्गार समितीने तालुका कृषी अधिकारी कार्यालय आळंदा फाटा बार्शीटाकळी येथे आमरण उपोषण सुरू केले आहे. दुबार पेरणी केलेल्या शेतकऱ्यांना झालेला सर्व खर्च द्यावा, मागील वर्षी आश्वासन दिलेल्या प्रमाणे हेक्टरी १७५०० विमा द्यावा, मार्केट मध्ये बोगस बियाणे विक्री करिता आले त्याकडे दुर्लक्ष झाले. महादेव गावंडे, प्रल्हाद माळकर, किरण ठाकरे, प्रल्हाद पाटील, जनार्दन ठोक, संतोष सेवक, सुरेश वानरे.

# कनिष्ठ भूवैज्ञानिक रश्मी चव्हाण यांचा अकोला जिल्हा बंजारा समाजाच्या महिला तर्फे नागरी सत्कार



प्रतिनिधी १९ जुलै

**अकोला.** महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागांतर्गत भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेमध्ये कनिष्ठ भूवैज्ञानिक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल रश्मी गोपीचंद चव्हाण यांचा अकोला जिल्हा बंजारा समाजाच्या महिलांच्या वतीने नागरी सत्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. यावेळी उपस्थित भगिनींनी कु. रश्मी चव्हाण यांचा शाल, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार केला. त्यांच्या यशाबद्दल अभिनंदन करत पुढील शासकीय सेवेसाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या. समाजातील मुलींनी उच्च शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून शासकीय सेवेत प्रवेश करावा, यासाठी कु. रश्मी चव्हाण यांचे यश प्रेरणादायी असल्याचे उपस्थितांनी नमूद केले. कार्यक्रमात सौ. लता राठोड, सुनिता राठोड, सुनिता जाधव, निमा जाधव, वंदना राठोड, सविता चव्हाण, सुरेखा चव्हाण, प्रतिमा जाधव, शिल्पा राठोड, संजना चव्हाण, विद्या राठोड, टीना जाधव, कल्पना राठोड, संजीवनी राठोड, राजकन्या राठोड, प्रियंका जाधव व अर्चना जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पत्नीविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी १९ जुलै

**जळगाव जामोद :** तालुक्यातील निंभोरा बु, येथील २२ वर्षीय विवाहित तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी मृताच्या वडिलांच्या तक्रारीवरून पत्नीविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी शनिवारी (१८ जुलै) जळगाव जामोद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृताचे नाव श्रीकृष्ण गजानन हरमकर (वय २२, रा. निंभोरा बु.) असे आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांचा विवाह ४ मे २०२४ रोजी झाला होता. वैवाहिक वादानंतर पत्नी माहेरी निघून गेली होती. तिला परत आणण्यासाठी अनेक प्रयत्न करूनही ती नांदण्यास तयार झाली नाही, असा आरोप फिर्यादीने केला आहे. फिर्यादीनुसार, काही दिवसांपूर्वी पत्नीने दुसऱ्या समाजमाध्यमांवर पाहिल्यानंतर श्रीकृष्ण व्यक्तीसोबत विवाह केल्याची छायाचित्रे हरमकर मानसिक तणावात गेले. त्यानंतर १३ जुलै रोजी सायंकाळी त्यांनी राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी मृताचे वडील गजानन प्रल्हाद हरमकर (रा. निंभोरा बु) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पत्नी भावना श्रीकृष्ण हरमकर (रा. जानेफळ, ता. मेहकर) हिच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# ऑपरेशन प्रहार अंतर्गत उरळ पोलिसांची अवैध गोवंश मांस विक्री करण्याऱ्यावर कारवाई

प्रतिनिधी १९ जुलै

**हातरूण :** पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या संकल्पनेतुन ऑपरेशन प्रहार अतंर्गत आज १९/०७/२०२६ रोजी सकाळी ०६/५० वाजताचे सुमारास पोलीस स्टेशन उरळ हद्दीतील ग्राम हातरूण येथुन अनोळखी इसम गोवंश जातीचे मांस विक्री करीता त्याचे जवळील मोटार सायकल ने वाहतुक करीत आहे अशा खात्रीलायक बातमीवरून कारंजा रमजानपुर फाटा व हाता फाटा येथे नाकाबंदी करून पहील्या कारवाई मध्ये आरोपी नामे गुलाम रसुल गुलाम हुसैन वय २९ वर्ष पंचगव्हान, ता. तेल्हारा, जि अकोला याचे कब्जातुन गोवंशीय प्राण्यावे अवैधरीत्या कत्तल केलेले मास ७० किलो, किं. अ.१४०००/-रूपये व एक मोटार सायकल की अंदाजे ८००००/ रूपये असा एकुण ९४०००/रू चा मुददेमाल हस्तगत केला तसेच दुस. या कारवाई मध्ये आरोपी नामे अब्दुल रहीम अब्दुल रहेमान वय ३२ वर्ष रा हातरून, ता. बाळापुर, जि. अकोला याचे कब्जातुन गोवंशीय प्राण्याचे अवैधरीत्या कत्तल केलेले मास ६५ किलो, किं. अ. १३०००/-रूपये व एक मोटार सायकल की अंदाजे ८००००/रूपये असा एकुण ९३०००/ रू चा मुददेमाल हस्तगत केला अशा प्रकारे दोन्ही आरोपीकडुन १,८७,०००/रू चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे. नमुद आरोपी याचेविरूध्द प्राणी संरक्षण अधिनियम १९७६ अन्वये विवीध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला



सदरची कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधिक्षक रेड्डी, उपविभागीय पोलीस अधिकारी पडघन यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार जनार्धन खंडेराव, उपनिरीक्षक परमेश्वर केंद्रे, ए एस आय सुरवाडे, पोहवा विजय चव्हान, पोहवा रघुनाथ नेमाडे, पो का रमेश जाधव, संतोष गाढवे, अनिल नागरे यांनी केली आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135